दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री
www.rashtrasahyadri.com
• संपादक : काकासाहेब नवले • RNI No. MAHMAR /2019/82605 • वर्ष ७ वे • अंक २५
• सोमवार, ०३ नोव्हेंबर २०२५ • पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 • पाने ६ • मूल्य रु. ४.००

# स्थानिकांच्या रोजगाराला प्राधान्य

## शिर्डीत जेम्स अँड ज्वेलरी प्रशिक्षण केंद्र सुरू करणार : उद्योगमंत्री उदय सामंत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** येथील औद्योगिक वसाहतीतील ६०० एकर परिसरात भविष्यात विविध उद्योग उभारले जाणार असून, या उद्योगांच्या स्थापनेदरम्यान कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होऊ नयेत, यासाठी उद्योजकांनी रोजगार देताना किमान ८० टक्के स्थानिक युवकांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन उद्योग व मराठी भाषा विभाग मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले.

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील श्री सद्गुरू नारायणगिरी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि टाटा टेक्नॉलॉजी संचलित कौशल्यवर्धन केंद्र यांच्या भूमिपूजन व कोनशिला अनावरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अमोल खताळ, म ाजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजयराव मुळीक, एमआयडीसीचे प्रादेशिक व्यवस्थापक गणेश राठोड, उपविभागीय अधिकारी माणिक आहिरे, टाटा टेक्नॉलॉजीचे सुशीलकुमार, टाटा कन्सल्टन्सीचे समन्वयक प्रितम गांजेवार, राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, तसेच कैलास कोते, अभय शेळके आदी उपस्थित होते. उद्योगमंत्री डॉ. सामंत म्हणाले की, राज्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यासाठी स्वर्गीय रतन टाटा यांच्याकडे ५० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यावर त्यांनी तब्बल ८०० कोटी रुपये उपलब्ध करून दिले. या निधीतून शिर्डी औद्योगिक वसाहतीत कौशल्यवर्धन केंद्र उभारले जात आहे. हे केंद्र स्थानिक युवकांच्या कौशल्य वृद्धीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, या परिसराचा औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. राज्य शासनाने औद्योगिक विकासासाठी शिर्डीत ६०० एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. आज महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत देशात पहिल्या क्रमांकावर असून, उद्योजकांना सक्षम बनविण्याचे कार्य शासनाने केले आहे. दावोस येथे १५ लाख कोटी रुपयांचे औद्योगिक करार करण्यात आले असून, त्यापैकी ८० करारांची अंमलबजावणी झाली आहे. मुंबई येथे उभारण्यात येणाऱ्या जेम्स अँड ज्वेलरी पार्क उद्योगांसाठी रत्नागिरी येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून अनेक तरुणांना ज्वेलरी उद्योगात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शिर्डीतही जेम्स अँड ज्वेलरी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येईल, अशी ग्वाही डॉ. सामंत यांनी दिली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, साईबाबा संस्थानच्या ५० कोटी रुपयांच्या (पान ४ वर)

### ● ३ हजार स्थानिक युवकांना रोजगार

शिर्डी एमआयडीसीसाठी सावळी विहीर येथील शेती महामंडळाची ५०० एकर जमीन शासनाने मोफत उपलब्ध करून दिली आहे. सावळी विहीर पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी ४०० कोटी रुपये, तसेच शिर्डी अपर जिल्हाधिकारी कार्यालय आणि बहुउद्देशीय सभागृहासाठी १०० कोटी रुपये शासनाने मंजूर केले आहेत. शिर्डी एमआयडीसीत संरक्षण उद्योगांसाठी २०० एकर जागा राखीव ठेवण्यात आली असून, यामुळे सुमारे ३ हजार स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

**– पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील**

# श्रीरामपुरात अवतरले शिवराय...

## ४० वर्षांची प्रतीक्षा संपली; शिवतीर्थ साकारले छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याचे घाटात लोकार्पण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील नागरिकांची तब्बल चाळीस वर्षांची प्रतीक्षा अखेर संपली! शहराच्या विकासाच्या नव्या पर्वाचे छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचे उद्घाटन नेत्रदीपक सोहळ्यात करण्यात आले. फटाक्यांच्या आतिषबाजीने आकाश उजळून निघाले, तर नयनरम्य सजावटीमुळे श्रीरामपूर शहर सणासुदीच्या थाटात नटले होते.

गावागावांतून दुचाकींवरून आणि मोटारसायकल रॅलीने आलेल्या युवकांनी जय श्रीराम पूर!च्या घोषणा देत उत्साहाचे वलय निर्माण केले. लाठी-काठी, मल्लखांब, तलवारबाजी यांसारख्या पारंपरिक व साहसी खेळांच्या नेत्रदीपक प्रदर्शनाने उपस्थितांचे डोळे दिपले.



या ऐतिहासिक सोहळ्यास उद्योगमंत्री उदय सामंत, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार विठ्ठलराव लंघे, आ. अमोल खाताळ, महंत अरुणनाथगिरी महाराज, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, सभापती दीपक पटारे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष माजी खासदार सदाशिव लोखंडे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, आ. भाऊसाहेब कांबळे आणि लहुजी कानडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी खासदार सुजय विखे पाटील म्हणाले, श्रीरामपूरच्या अनेक वर्षांच्या प्रलंबित प्रश्नांना आता न्याय मिळत आहे. संघर्ष संपला असला तरी पुढचा टप्पा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याच्या उभारणीसाठी सर्वांनी एकत्र यावे.

शिर्डी, राहता आणि नेवासा तालुक्यातील कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला ऐतिहासिक यश मिळवून दिले.

श्रीरामपूरच्या विकासाचा हा नवा अध्याय खऱ्या अर्थाने शहराच्या आत्मविश्वासाला नवी झळाळी देणारा ठरला.

### झापुक । zupuk

स्मशानभूमीत भरतो
सामाजिक एकतेचा मेळा
एकाच्या अंत्यविधीला
भगवे हिरवे निळे
झाले गोळा
जमले हजारो मात्र
एकटाच जळत होता
आपण सारे एक राहू
प्रत्येकजण म्हणत होता

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

# भरदिवसा बिबट्याचा हल्ला ; १३ वर्षीय रोहन ठार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** शिरूर तालुक्यातील पिंपरखेड गाव पुन्हा एकदा बिबट्याच्या हल्ल्याने दहलले आहे. आज दुपारी सुमारे पावणे चारच्या सुमारास १३ वर्षीय रोहन विलास बोंबे या मुलावर बिबट्याने झडप घालून ऊसाच्या शेतात ओढून नेले. या भीषण हल्ल्यात रोहनचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

रोहन हा घराबाहेर मोकळ्या शेतात खेळत असताना हत्ती गवतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर झडप घातली. काही क्षणांतच त्याला ऊसाच्या शेतात खेचत नेले. मुलगा दिसेनासा झाल्याचे लक्षात येताच त्याचे आई-वडील आणि ग्रामस्थांनी आरडाओरड करत परिसरात शोध मोहीम सुरू केली. थोड्याच वेळात शेतात रोहनचा मृतदेह आढळून आला. या हृदयद्रावक घटनेनंतर ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली. ग्रामस्थांनी वनविभागाच्या निष्क्रीय कारभाराचा निषेध करत वनविभागाचे वाहन पलटी करून पेटवून दिले. या घटनेमुळे पिंपरखेड परिसरात तणावाचे (पान ४ वर)

### संतप्त ग्रामस्थांनी वनविभागाची गाडी पेटवली

रोहनच्या मृत्यूनंतर संतप्त ग्रामस्थांनी वनविभागाविरोधात तीव्र आंदोलन सुरू केले. मागील दोन घटनांनंतरसुद्धा बिबट्यांचा बंदोबस्त करण्यात आलेला नाही. ग्रामस्थांनी वनविभाग जबाबदार आहे असा आरोप करत वनविभागाची गाडी पेटवून दिली. गावात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



## महत्वाचे...

### व्यंकटेश्वर मंदिरात चेंगराचेंगरी; नऊ भाविकांचा मृत्यू

**काशीबुग्गा :** व्यंकटेश्वर मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले. ही घटना शनिवारी सकाळी साडेअकरा वाजता घडली. भाविकांच्या गर्दीमुळे रेलिंग तुटले आणि अनेकजण खाली कोसळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. काशीबुग्गा येथील व्यंकटेश्वराचे मंदिरात कार्तिकी एकादशीमुळे मोठी गर्दी झाली होती. पहिल्या मजल्यावर जाणाऱ्या रांगेचे रेलिंग तुटल्यामुळे भाविक एकमेकांच्या अंगावर पडले. त्यात सातजणांचा जागेवरच मृत्यू झाला, तर दोन जणांचा उपचारांदरम्यान मृत्यू झाल्याचे श्रीकाकुलमचे जिल्हाधिकारी स्वप्नील पुंडकर यांनी सांगितले.

# जिल्हा बँक भरती घोटाळ्यांना चाप

## भरती ऑनलाईन करण्याचा शासन निर्णय जारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील जिल्हा बँकांच्या भरती प्रक्रियावरुन अनेकदा प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामध्ये पैशाचा व्यवहार केला जातो, ती पारदर्शक नसते अशी तक्रार सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनीही अनेकदा केली आहे. त्यामुळे राज्य शासनाने आता महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील जिल्हा बँकांची भरती आता ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. तसा जीआर शासनाने जारी केला आहे.

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष व्हावी आणि पात्र उम ेदवारांना संधी मिळावी यासाठी भरती प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्याचा राज्य महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. त्या संबंधी शासनाचा जीआर जारी करण्यात आल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.शासनाच्या या नव्या निर्णयामुळे भ्रष्टाचाराला आळा बसण्याची शक्यता आहे. या भरती प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात पैशाचा व्यवहार होतो, आपल्याच लोकांची भरती केली जाते असा आरोप अनेकदा केला जातो. त्याला आता आळा बसेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. सदर शासन निर्णय आज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी पारदर्शकपणे जाहिरात व शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी प्रसिद्ध केली आहे त्या बँकांनाही लागू राहील.या बँकांची नोकरभरती प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी वरील आयबीपीएस, टीसीएस-आयऑन आणि एमकेसीएल या संस्थांकडून एकाच संस्थेमार्फत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात शासन मान्यता देण्यात येत आहे.

### स्थानिक उमेदवारांसाठी ७० टक्के जागा

संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र असलेल्या जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेल्या उमेदवारांना ७० टक्के जागा राखीव ठेवण्यात येणार आहेत. तर उर्वरित ३० टक्के जागा जिल्हाबाहेरील उमेदवारांसाठी खुल्या असतील. तथापि, जिल्हाबाहेरील उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास त्या जागा स्थानिक उम ेदवारांसाठी भरता येतील, असं शासन आदेशात म्हटलं आहे.

## गिरनारच्या ६०० पायऱ्या चढल्यानंतर तरुणाला हृदयविकाराचा झटका

**रत्नागिरी :** जिल्ह्यातल्या गुहागर तालुक्यातील शृंगारतळी येथील एका तरुण व्यापाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. देवदर्शनासाठी गिरनार येथे गेलेल्या प्रसाद उर्फ बाळा रवींद्र संसारे (वय ४६, रा.जानवळे, ता. गुहागर) यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. विशेष म्हणजे गिरनारच्या ६०० पायऱ्या चढल्यानंतर त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रसाद संसारे हे गुहागर येथील काही मित्रांसह गुजरातमधील गिरनार येथे दर्शनासाठी गेले होते. शनिवारी सकाळी सुमारे सहा वाजता ते पायऱ्या चढत असताना अचानक कोसळले. त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने जागीच त्यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेची माहिती सोबत असलेल्या मित्रांनी तात्काळ शृंगारतळीत त्यांच्या नातेवाईकांना दिली.

# कार्तिकी एकादशीनिमित्त एकनाथ शिंदेंच्या हस्ते सपत्नीक पांडुरंगाची महापूजा

## नांदेडचे रामराव अन् सुशिलाबाई वालेगावकर ठरले मानाचे वारकरी; पहिल्यांदाच दोन शाळकरी मुलांचा पुजेत सहभाग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पंढरपूर :** कार्तिकी एकादशीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक आज विठुरायाची शासकीय महापुजा संपन्न झाली. यावेळी दर्शन रांगेतील पहिले मानाचा वारकरी दांपत्य उपमुख्यमंत्र्यांसमवेत महापूजेमध्ये सहभागी झाले होते. नांदेडच्या हिमायतनगरमधील पोटा गावाचे रामराव वालेगावकर आणि सौ.सुशिलाबाई वालेगावकर हे कार्तिकी एकादशीनिमित्त मानाचे वारकरी ठरले. म ागील २० वर्षांपासून ते वारी करतायत, मंदिर समितीच्या वतीने शिंदेंच्या हस्ते तुळशीची म ाळ घालून त्यांचा सत्कार करण्यात आलाय. दरम्यान, खासदार श्रीकांत शिंदे देखील पत्नी आणि मुलासह या शासकीय महापूजेच्या वेळी उपस्थित होते. तर मंत्री भरत गोगावले, जयकुमार गोरे देखील यावेळी उपस्थित होते. तर यंदा पहिल्यांदाच जिल्हा परिषद शाळेचे दोन शाळकरी मुलं पुजेत सहभागी झाले होते.

आषाढी व कार्तिकी महापूजा सामील झालेले मानाचे वारकरी दाम्पत्यांना एक वर्षाचा नाही तर कायमस्वरूपी एसटीचा म ोफत देण्याचा प्रयत्न करतो, असं एकनाथ शिंदे म्हणाले. विठ्ठल मंदिर आणि परिसरात एक वेगळी ऊर्जा आहे. चौथ्यांदा महापूजेस म्हणून मिळाला. खूप भाग्यवान समजतो. इथे फक्त व्हीआयपी वारकरी आहेत. शाखा



प्रमुख ते राज्याचा मुख्यमंत्री...ही सगळी पदे विठ्ठलांमुळे मिळाली, असं म्हणत एकनाथ शिंदेंनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सलग ७ महिने पाऊस पडतो आहे. बळीराजा वरचे सर्व संकटे दूर कर...त्याच्या जीवना सुखाचे आनंदाचे दिवस येऊ दे..संपूर्ण महाराष्ट्र हाच आमचा परिवार...सर्वांना चांगली सुखासमृद्धीचे दिवस येऊ दे हा आमचा अजेंडा आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. एमटीडीसी जागा ३० वर्षे मंदिराला देणार तर चंद्रभागा प्रदूषण मुक्त करणार, असं आश्वासन देखील एकनाथ शिंदेंनी यावेळी दिले.

आषाढी आणि कार्तिकी वारी ही वारकऱ्यांसाठी खरी दिवाळी असते, त्यामुळे हा दिवस अनुपम्य सोहळा ठरवा यासाठी स्वच्छता, पाणी पुरवठा, आरोग्य सेवा, चंद्रभागेच्या तीरावर अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. राजकीय अधिष्ठानापेक्षा आध्यात्मिक अधिष्ठान उच्च दर्जाचे मानून काम करणारा मी कार्यकर्ता असल्याचे याप्रसंगी आवर्जून नमूद केले. तसेच वारकरी हे शेतकरीच असतात, सध्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असून त्यासाठी राज्य शासनाने ३२ हजार कोटींची मदत जाहीर केली आहे. तसेच जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. त्यामुळे आज बळीराजावरील सर्व दुःख, संकटे दूर कर एवढेच मागणे मागण्यासाठी पांडुरंगाच्या चरणी आलो असल्याचं एकनाथ शिंदे म्हणाले.

# दहीगाव आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांची टंचाई

## ३० हजार नागरिकांसाठी फक्त दोनच सेवक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** तालुक्यातील दहीगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे कार्यक्षेत्र तब्बल ३० हजारांहून अधिक लोकसंख्येपर्यंत विस्तारलेले असून, या केंद्रात केवळ दोनच आरोग्य सेवकांवर संपूर्ण जबाबदारी आहे. साथरोग नियंत्रण, लसीकरण, मातृत्व व बालआरोग्य सेवा तसेच गावागावांत फिरून आरोग्य तपासणी अशा विविध जबाबदाऱ्यांचा प्रचंड ताण या दोन कर्मचाऱ्यांवर पडत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने मनुष्यबळ वाढवावे, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे.




नवीन आराखड्यानुसार शहरटाकळी येथे एक व देवटाकळी येथे तीन आरोग्य सेवक पदे मंजूर करण्यात आली असली, तरी दहीगाव केंद्राचे विस्तृत कार्यक्षेत्र पाहता किमान दोन ते तीन आरोग्य सेवक आणि दोन ते तीन आरोग्य सेविका तातडीने नेमाव्यात, अशी मागणी स्थानिक प्रतिनिधींनी केली आहे.

दरम्यान, साथरोग प्रतिबंध आणि आपत्कालीन आरोग्यसेवेसाठी भातकुडगाव फाटा येथे '१०८ म्बुलन्स' उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी आमदार मोनिकाताई राजळे यांच्याकडे करण्यात आली आहे. या निर्णयामुळे दहीगाव, देवटाकळी, शहरटाकळी, भातकुडगाव व परिसरातील गावांना तातडीच्या वैद्यकीय सेवांचा लाभ सहज मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

या मागणीस संदीप खरड, वाय. डी. कोल्हे, सुभाष बरबडे, लक्ष्मण काशीद, अनिल सुपेकर, आसाराम नर्हे, महादेव पवार, सुरेश बडे, नारायण काळे, रामप्पा गिरम, अशोक निंबाळकर, अशोक मुरकुटे, अमोल खरड, महेंद्र खरड, देविदास शिरसाठ, डॉ. शाम काळे, रमेश कळमकर, रणजित वणे, संतोष आढाव व नानासाहेब लांडे यांसह अनेक ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शविला आहे.ग्रामस्थांनी सांगितले की, दहीगाव केंद्राचे कार्यक्षेत्र प्रचंड असून कर्मचाऱ्यांची कमतरता गंभीर स्वरूपाची आहे. शासनाने तातडीने नवीन नियुक्त्या करून आरोग्यसेवा सशक्त करावी.दहीगाव आरोग्य केंद्रात आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास आरोग्यसेवा अधिक प्रभावीपणे राबविता येईल आणि नागरिकांपर्यंत शासकीय आरोग्य योजना अधिक परिणामकारकपणे पोहोचतील, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## कोरेगाव भीमात युवतीची गळफास घेऊन आत्महत्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे:** शिरूर तालुक्यातील कोरेगाव भीमा येथील अलअमीन कॉलेज समोर संजय सोनवणे यांच्या मालकीच्या खोलीत राहणाऱ्या अनुष्का वाघमोडेचे वडील गावी गेल्याने अनुष्का एकटीच घरी होती, दुपारच्या सुमारास अनुष्काची मैत्रीण घरी आली असताना अनुष्का आतून दरवाजा उघडत नसल्याने तिने खोली मालकांना याबाबत माहिती दिल्याने संजय सोनवणे यांनी पोलिसांना माहिती देताच पोलीस हवालदार हनुमंत गिरमकर यांनी घटनास्थळी जात पाहणी करत दरवाजा उघडून आतमध्ये प्रवेश केला असता अनुष्काने साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले, सदर घटनेत अनुष्का गणेश वाघमोडे (वय १९ वर्षे सध्या रा. कोरेगाव भीमा ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. आष्टी ता. मोहोळ जि. सोलापूर) हिचा मृत्यू झाला असून याबाबत साधना राजेश माने (वय ४२ वर्षे रा. कोरेगाव भीमा ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार गणेश कुदळे करत आहे.

## पॉवर मॅरेथॉन एकतेचा संदेश देणारा उपक्रम : ना. मकरंद पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती पॉवर मॅरेथॉन हा केवळ एक क्रीडा उपक्रम नाही, तर आरोग्यदायी जीवनशैलीचा उत्सव आणि सामूहिक एकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम आहे, असे प्रतिपादन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी केले.



मंत्री पाटील यांच्या हस्ते बारामती स्पोर्ट फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित बारामती पॉवर मॅरेथॉनला झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष कार्यकारी खाजगी सचिव विकास ढाकणे, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी सुनील मुसळे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, एमआयडीसी बारामतीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, तहसीलदार गणेश शिंदे, तालुका क्रीडा अधिकारी महेश चावले, बारामती पॉवर मॅरेथॉनचे आयोजक सतीश ननावरे आदी उपस्थित होते.यावेळी मंत्री पाटील यांनी मरेथॉनचे आयोजक आणि सहभागी धावपटूंना शुभेच्छा दिल्या आणि त्यांचे अभिनंदन केले. यावेळी ते म्हणाले, बारामतीने क्रीडाक्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे आणि अशा उपक्रमांमुळे तरुण पिढीला नवचैतन्य मिळते असेही पाटील म्हणाले.मुख्य स्पर्धेत ४२.२ किमी फुल मॅरेथॉन, २१.१ किमी हाफ मॅरेथॉन, १० किमी रन आणि ५ किमी फन रन अशा चार गटांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आली. बारामती पॉवर मॅरेथॉन सिझन-३ मध्ये ५ हजारांहून अधिक धावपटूंचा उत्स्फूर्त सहभाग घेतला.

नागपूर येथील सात वर्षांची कुमारी आर्या पंकज टाकोणे हिने ५ किमी धाव २५ मिनिटांत पूर्ण करत वर्ल्ड रेकॉर्ड नोंदविण्यात आला.उपमुख्यमंत्री यांचे खासगी सचिव डॉ. अमर भडंगे, क्रीडा मंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी सुनील आगरकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेतला.

## श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या विश्वस्तांची बिनविरोध निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या नावाने कार्यरत असलेल्या श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संस्थेच्या शेठ कांतीलाल नंदराम चोरडिया सांस्कृतिक सभागृहात संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेत विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. संस्थेचे सचिव अजित वडगांवकर यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की, संस्थेची सर्वांगीण प्रगती हेच आमचे ध्येय असून विद्यार्थ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.




सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी झालेल्या निवड प्रक्रियेत संस्थेचे सात विश्वस्त बिनविरोध निवडले गेले. यात सुरेश धनराज वडगांवकर, अजित सुरेश वडगांवकर, डॉ.ज्ञानेश्वर श्रीधर पाटील, पांडुरंग चंद्रकांत कुऱ्हाडे, प्रकाश देवराम काळे, लक्ष्मण गुलाबराव घुंडरे आणि योगेंद्र गोपाळ कुऱ्हाडे या सदस्यांचा समावेश आहे.

सभासदांनी आम्हाला एकमताने निवडून दिल्याबद्दल सर्व विश्वस्तांनी सभासदांचे आभार मानले. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांच्या सहकार्याने एकत्रितपणे कार्य करू, असा निर्धार या वेळी सर्व विश्वस्तांनी व्यक्त केला.

## श्री क्षेत्र बहिरवाडीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** श्री कालभैरवनाथांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील जागृत असलेल्या श्री क्षेत्र बहिरवाडी येथील श्री कालभैरवनाथ मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन गुरुवार दि.६ नोव्हेंबर ते गुरुवार दि.१३ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात आले असल्याची माहिती देवस्थान अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या वतीने देण्यात आली.



श्री कालभैरवनाथांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित रात्रीच्या किर्तन सोहळयात देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज, नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के,पाथर्डी येथील विकास महाराज औटी,बहिरवाडी येथील स्वर भूषण लक्ष्मण महाराज नांगरे,विजय महाराज पवार,बाल ब्रम्हचारी हभप विश्वनाथजी महाराज,भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे किर्तनाचे कार्यक्रम होणार आहे.

## एकल महिलांच्या समस्या प्राधान्याने सोडवू : डॉ. संजय बिरादार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील सर्व प्रकारच्या एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे तहसीलदार तथा मिशन वात्सल्य समितीचे अध्यक्ष डॉ. संजय बिरादार यांनी सांगितले. नेवासा तहसील कार्यालयात 'शासन आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत मिशन वात्सल्य योजनेच्या समन्वय समितीची बैठक तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत साऊ एकल महिला समितीचे समन्वयक व मिशन वात्सल्य समितीचे अशासकीय सदस्य कारभारी गरड यांनी कोरोना काळापासून एकल महिला व बालकांसाठी समितीने केलेल्या कामांचा आढावा घेतला.बैठकीस सचिव तथा एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी भावना पवार, विजया जाधव, सहायक गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार, संजय गांधी योजनेचे नायब तहसीलदार संदीप चिंतामणी, गट शिक्षणाधिकारी प्रतिनिधी रुकसाना शेख, समी शेख, विधि सेवा प्राधिकरणचे अधीक्षक अमित मानकर, अशासकीय सदस्य आप्पासाहेब वाबळे, भारत आरगडे आदी उपस्थित होते.

## बारामतीच्या साई पालखीचे कोल्हारला स्वागत



(छाया-प्रमोद कुंभकर्ण)

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** बारामती येथून बारामतीचे विद्यमान नगरसेवक व साई सेवा ट्रस्टचे संस्थापक बिरजू मांढरे यांच्या नेतृत्वाखाली त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त शिर्डी येथे पायी निघालेल्या साई पालखीचे कोल्हार भगवतीपुर येथे स्वागत करण्यात आले यावेळी संतश्रेष्ठ साईबाबांची पालखी येथील ग्रामदैवत भगवती माता मंदिराच्या सभा मंडपात दर्शनासाठी ठेवण्यात आली होती.

साई पालखी सोहळ्याचे हे चौदावे वर्ष असून पालखी सोहळ्यात १००० महिला पुरुष साई भक्त सहभागी झाले आहेत २४ ऑक्टोबर रोजी निघालेला हा पालखी सोहळा ३ नोव्हेंबर रोजी शिर्डी येथे पोहोचणार असून दररोज २४ किलोमीटर पायी प्रवास करीत साईबाबांचा जयजयकार करीत प्रस्थान ठेवीत असतात. पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी हरिभाऊ केदारी समीर सुपेकर अण्णा साळुंखे सुमित मांढरे सचिन टावरे विजय मांढरे विजय तेलंग दत्ता चांदणे लहुजी जाधवआदी प्रयत्नशील आहेत.

## संपादकीय

### पारदर्शकतेची सुरुवात की राजकीय खेळाची सुरक्षितता?

महाराष्ट्राच्या सहकारी क्षेत्रातील भरती प्रक्रिया नेहमीच वादग्रस्त राहिली आहे. पैशाच्या देवाणघेवाणीपासून ते राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांची नेमणूक, अशा घोटाळ्यांनी भरलेल्या या प्रक्रियेवर आता शासनाने ऑनलाइन भरतीचा निर्णय घेतला आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जाहीर केलेल्या या सरकारी निर्णयानुसार (जीआर), जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरती आता आयबीपीएस, टीसीएस-आयऑन आणि एमकेसीएल या मान्यताप्राप्त संस्थांमार्फत ऑनलाइन घेतली जाईल. यामुळे ७० टक्के जागा स्थानिक उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात येतील, तर उर्वरित ३० टक्के जिल्हाबाहेरील उमेदवारांसाठी खुल्या राहतील. ही पावले भ्रष्टाचार रोखण्यासाठी स्वागतार्ह असली तरी, सहकारी बँकांचा दीर्घकालीन राजकीय गैरवापर आणि वादग्रस्त इतिहास लक्षात घेता, हा निर्णय केवळ जुजबी उपाय आहे की खरी सुधारणा, असा प्रश्न उपस्थित होतो.

महाराष्ट्रातील सहकारी बँका हे राजकीय नेत्यांसाठी 'सॉफ्ट पॉवर' बनल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर सहकार चळवळीचा उद्देश शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे असा होता, पण आज त्या राजकीय फायद्यासाठी गैरवापर होत आहेत. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारांच्या काळात सहकारी संस्थांची 'मठ्ठ्या प्रमाणात' नोंदणी झाली, ज्यात अनेक संस्था कधीच अस्तित्वात आल्या नाहीत. हे राजकीय लाभ पदरात पाडण्यासाठी होते. उदाहरणार्थ, २००६ नंतर ६० नागरी सहकारी बँका, ५ जिल्हा बँका आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची संचालक मंडळे बरखास्त झाली, तरी राजकीय हस्तक्षेपामुळे कारवाई रखडते. १४ वर्षांत ३७५ सहकारी बँका बंद पडल्या, ज्यामुळे लाखो शेतकरी आणि छोटे बचतखाते धारकांचे नुकसान झाले. राजकीय नेते बँकांच्या संचालक मंडळावर बसून कर्ज वाटप करतात, जे मग निवडणुकीत 'फीडबॅक' म्हणून परतावे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळ्यात ७० वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांची नावे आली, ज्यात २५ हजार कोटींचा अपहार उघड झाला. हा गैरवापर थांबवण्यासाठी केवळ कायद्याच्या दुरुस्त्या पुरेश्या नाहीत; राजकीय हस्तक्षेपावर पूर्ण प्रतिबंध आवश्यक आहे.

जिल्हा सहकारी बँकांच्या भरती प्रक्रिया हे राजकारणाचे 'हॉटस्पॉट' ठरले आहेत. गेल्या काही वर्षांत अनेक बँकांमध्ये पैशाच्या बदल्यात जागा वाटपाच्या आरोपांनी वातावरण ढवळून निघाले. उदाहरणार्थ, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ३६० पदांसाठी वादग्रस्त एजन्सीची निवड झाली, जी महाराष्ट्राबाहेरील आणि पूर्वी यवतमाळ बँक भरतीत गुंतागुंतीत अडकली होती. जळगाव जिल्हा बँकेत १२५ लिपिक पदांसाठी कला शाखेच्या (बीए, एमए) उमेदवारांना वगळण्याचा निर्णय घेतला गेला, ज्यामुळे हजारो बेरोजगार तरुणांच्या नाराजीने आंदोलने झाली. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत २०१९-२०२० मध्ये लेखापरीक्षेत कलम ८८ अंतर्गत चौकशी सुरू झाली, ज्यात २,००० कोटींचा तोटा उघड झाला. आकडेवारी सांगते की, २००६-२०२३ दरम्यान ३१ जिल्हा बँकांपैकी १० पेक्षा जास्त बँकांमध्ये भरती वाद झाले, ज्यात सुमारे १,५०० पदांवर अनियमितता आढळल्या. या प्रकरणांमध्ये नेहमीच 'आपल्या लोकांची' भरती आणि पैशाचा व्यवहार असतो, ज्यामुळे पात्र उमेदवार बाजूला होतात. हे राजकारण भरतीला 'निवडणूक फंड' बनवते, ज्यात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेससह सर्व पक्ष अडकले आहेत.

भरतीतील घोटाळे रोखण्यासाठी तंत्रज्ञान हा सर्वोत्तम उपाय आहे, आणि शासनाचा ऑनलाइन निर्णय त्याचे उत्तम उदाहरण आहे. पारंपरिक पद्धतीत कागदोपत्री प्रक्रिया, मुलाखती आणि स्थानिक प्रभाव यामुळे भ्रष्टाचाराला मोकळीक मिळते. ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे अर्ज, परीक्षा आणि निकाल जाहीर होणे हे पारदर्शकतेसाठी क्रांतिकारी ठरेल. आयबीपीएससारख्या संस्था यापूर्वी बँक भरतीत यशस्वी झाल्या आहेत, ज्यात डिजिटल ट्रॅकिंगमुळे फसवणूक शून्य झाली. महाराष्ट्रात २०२० नंतर डिजिटल भरतीमुळे सरकारी नोकऱ्यांमध्ये ३० टक्के तक्रारी कमी झाल्या आहेत. मात्र, ग्रामीण भागातील डिजिटल डिव्हाईड दूर करणे, सायबर सुरक्षितता आणि प्रशिक्षण आवश्यक आहे. तंत्रज्ञान केवळ साधन नाही; ते प्रक्रियेला न्याय्य बनवते आणि राजकीय हस्तक्षेप रोखते.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भरती प्रक्रिया हे वादग्रस्त भरतीचे क्लासिक उदाहरण आहे. २०२४-२५ मध्ये ६९०-७०० पदांसाठी (जनरल मॅनेजर, मॅनेजर, लिपिक, वाहनचालक इ.) भरती जाहीर झाली, पण वर्कवेल इन्फोटेक कंपनीमार्फत राबवलेल्या प्रक्रियेत मोठा घोटाळा उघड झाला. याचिकाकर्त्यांनी आरोप केला की, ही प्रक्रिया बेकायदा आहे आणि पैशाच्या बदल्यात जागा वाटप झाले. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (न्यायमूर्ती अरुण पेडणेकर) मे २०२५ मध्ये याची दखल घेतली आणि बँकेचे अध्यक्ष (भाजप आमदार स्व. शिवाजी कर्डिले), मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ आणि कंपनीला नोटिसा बजावल्या. विधानसभा निवडणुकीच्या काळात ही भरती राबवल्याने राजकीय रंग चढला. यामुळे संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याची मागणी झाली. हा वाद शासनाच्या नव्या निर्णयाची गरज अधोरेखित करतो, ज्यात अशा हरकतींना आळा बसेल.

शासनाचा ऑनलाइन भरतीचा निर्णय हा भ्रष्टाचाराच्या मुळाशी जाणारा उपाय नाही, तर सुरुवात आहे. सहकारी बँकांचा राजकीय गैरवापर थांबवण्यासाठी कायद्यात कडक दुरुस्त्या, स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा आणि तंत्रज्ञानाचा पूर्ण वापर आवश्यक आहे. अन्यथा, हे घोटाळे पुन्हा उपसर्ग घेतील आणि तरुणांच्या भविष्यावर कलंक पडेल. महाराष्ट्राच्या सहकार चळवळीला खरी ताकद देण्यासाठी राजकारण बाजूला ठेवून पारदर्शकता प्रथम येईल, अशी अपेक्षा आहे. अन्यथा, ही 'नवीन सुरुवात' फक्त जुनी चक्रे गळ्यात बांधण्यापुरती मर्यादित राहील.

## आळंदी पालिका निवडणुकीसाठी भाजप प्रभारीपदी प्रदीप कंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**आळंदी :** आगामी आळंदी नगरपरिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक हालचालींना वेग दिला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांची आळंदी नगरपरिषद निवडणूक प्रभारीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा होताच आळंदी व परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भाजपच्या निवडणूक रणनितीचे नियोजन, उमेदवारांची निवड, तसेच प्रचार मोहिमेची आखणी या सर्व बाबींचे मार्गदर्शन प्रदीप कंद यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. जिल्ह्यातील संघटन कार्यात त्यांनी दाखवलेले नेतृत्व आणि समन्वय कौशल्य लक्षात घेऊन ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

स्थानिक स्तरावर भाजपला बळकट करण्यासाठी, तसेच आळंदी नगरपरिषदेवर भगवा फडकविण्याच्या उद्दिष्टाने पक्षाची यंत्रणा सज्ज होत असल्याची माहिती भाजपाचे पुणे जिल्हा सचिव किरण येळवंडे यांनी दिली. येत्या काही दिवसांत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक होणार असून, निवडणुकीच्या तयारीला गती दिली जाणार आहे.

|| श्री भीमाशंकर प्रसन्न ||

**श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थान (ज्योतिर्लिंग), भोरगिरी**

(रजि.ट्रस्ट नं. जे १०२१)

श्री क्षेत्र भीमाशंकरवाडी, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०९

संपर्क कार्यालय : दुसरा मजला, राजगुरुनगर सहकारी बँक-टिळक चौक शाखा, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.-४१०५०५

officeshreebhimashankar.com www.shreebhimashankar.com

दिनांक : ३१ ऑक्टोबर २०२५

**निविदा सूचना क्र. ०३ सन २०२५-२६**

खालील कामाच्या सिलबंद निविदा श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थान कार्यालय, २ रा मजला, राजगुरूनगर सहकारी बँक लि. टिळक चौक शाखा, राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०५ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा या श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानचे कार्यालयात दि. ०३/११/२०२५ ते दि. ११/११/२०२५ या कालावधीमध्ये भरून हार्डकॉपीचे स्वरूपात भरावयाच्या आहेत व भरून पाठविलेल्या निविदा श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानचे कार्यालयात दि. १२/११/२०२५ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत स्वीकारतील आणि शक्यतो निविदा त्याच दिवशी किंवा संस्थान ठरविल त्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचा प्रकार | प्रत्यक्षात कामे पूर्ण करणेसाठी मंजूर करणेत आलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १) | श्री क्षेत्र भीमाशंकर, ता. खेड, जि. पुणे येथे दर्शनपास बारीसाठी लोखंडी जिना बनविणे, | रु. ३५,३०,४८१/- | सर्वसाधारण खुला प्रवर्ग |
| २) | श्री क्षेत्र भीमाशंकर, ता. खेड, जि.पुणे येथे संरक्षक भिंत बांधणे व २) सीमेंट रोडवरील गटर दुरुस्ती करणे. | रु. ४,१९,३२०/- | सर्वसाधारण खुला प्रवर्ग |
| ३) | श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थान, ता. खेड, जि. पुणे साठी लाडूप्रसाद बनविणे व मंदिर परिसरामध्ये विक्री करणे, | -- | सर्वसाधारण खुला प्रवर्ग |
| ४) | श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थान, ता. खेड, जि. पुणे येथील बेलफूल निर्माल्य पासून अगरबत्ती व धूप बनविणे व मंदिर परिसरामध्ये विक्री करणे. | -- | सर्वसाधारण खुला प्रवर्ग |

१) निविदाकारांनी सावधानता बाळगून निविदा सादर करण्याच्या किमान १ दिवस आधी सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज संबंधित कार्यालयात सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा निविदा स्वीकारण्यात येणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. २) सदर कामाबाबत निविदा फॉर्म हा श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थान कार्यालय, २ रा मजला, राजगुरूनगर सहकारी बँक लि. टिळक चौक शाखा, राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०५ येथून निविदाधारकांनी प्राप्त करून घ्यावा. ३) निविदा धारकांनी संस्थान कर्मचारी यांच्या सोबतच्या स्थळ पाहणी अहवाल व जिओटॅग फोटो जोडणे अनिवार्य राहील. ४) ज्या निविदाकारांनी निविदा मंजूर झालेले आहे, त्या निविदाकाराने सदर कामाचे आदेश प्राप्त होताच ३ दिवसांत काम सुरू करण्यात यावे अन्यथा सदर निविदा रद्द करण्यात येईल. ५) सदर कामाचा कालावधी कार्यारंभ आदेशानंतर ३० दिवस असेल, कोणत्याही परिस्थितीत सदर कामास मुदतवाढ देण्यात येणार नाही. ६) मक्तेदार यांनी लखोटा क्रमांक १ मध्ये संबधीचे तांत्रिक व आर्थिक क्षमता आवश्यक कागदपत्रे ठेवावेत. तसेच २ मध्ये सदोष भरलेले दरपत्रक ठेवून सीलबंद करून राजगुरूनगर येथील संस्थानचे कार्यालयात दाखल करावा. ७) कोणतेही कारण न देता विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा पैकी एक निविदा स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकरण्याचा अधिकार श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानने राखून ठेवला आहे. ८) सदर निविदा संदर्भातील सर्व अधिकार अध्यक्ष, श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थान यांनी राखून ठेवले आहेत. ९) एका कामाची निविदा फॉर्मची रक्कम ५००/- रु. एवढी राहील. १०) १ टक्का बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (ऊशारपव ऊीरषीं) किंवा मुदत ठेव स्वरूपात स्वीकारली जाईल.

शिक्का

**(ॲड. सुरेश कौदरे)**
अध्यक्ष,
श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थान

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे पती कै. मिलींद भिमाजी इघे याचे दि. ०२/०८/२०२५ रोजी निधन झाले. त्याच्या नावे पिंपरी-चिंचवड आर.टी.ओ. मध्ये नोंद असलेली PIAGGIO VEHICLES PVT LTD कंपनीचे मॉडेल APE XTRA LDX+ HD थ्री व्हिलर माल वाहू गाडी नं.MH14 JP 7060 **चॅसिज नं.** MBX0008SB1K230362 **इंजिन नं.** S2K9226575, **कलर** - C- Orange असा आहे. कायदेशीर वारसदार म्हणून मी माझ्या नावे सदर वाहन हस्तांतर करण्यास उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड कार्यालय यांच्याकडे कागदपत्रे सादर करीत आहे. सदर वाहनासंदर्भात जर कोणाचीही कसलीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे. अन्यथा आपल्यापैकी कोणाचीही कसलीही तक्रार नाही. असे गृहित धरुन सदर वाहन मी माझ्या नावे हस्तांतर करुन घेत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

**श्रीमती रुपाली मिलींद इघे**
रा.स्वप्नपुर्ती हाऊसिंग सोसा.गट नं.१७१ पी, मंत्रा मोमेंट सोसा. जवळ, देहू-आळंदी रस्ता, बोऱ्हाडेवाडी, मोशी,पुणे ४११ ०७०.
मो.७२१९४६१५७६

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# संगमनेरला औद्योगिक वसाहतीसाठी पुढील आठवड्यात बैठक : ना. सामंत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** राज्यातील कर्तबगार आमदार म्हणून आ.अमोल खताळ यांची ओळख आहे.काम मंजूर करून घेण्यात त्यांचा हातखंडा कोणी धरू शकणार नाही. तालुक्यात औद्यगिक वसाहतीची त्यांची मागणी पूर्ण करण्यासठी आपण पुढील आठवड्यातच बैठक घेणार असल्याची ग्वाही उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांनी दिली.

आ.अमोल खताळ यांच्या पुढाकाराने जेष्ठ तमाशा कलावंत स्व.कांताबाई सातारकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणार्या पहील्या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत आणि जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावर्षीचा पहिला पुरस्कार सातारा जिल्ह्याच्या वाई येथील तमाशा कलावंत कोडीराम आवडे मास्तर यांना मानपत्र स्मृतीचिन्ह २१हजाराचे मानधन देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी व्यासपीठावर पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. गणेश चंदनशिवे शाहीर विठ्ठल उमप यांच्या कन्या संगीता आणि कविता उमप प्रा.एस झेड देशमुख बापुसाहेब गुळवे नाट्यकलावंत डॉ सोमनाथ मुटकुळे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते, बाबूशेठ टायरवाले, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठलराव घोरपडे, तालुकाध्यक्ष रामभाऊ राहाणे, राजेंद्र सोनवणे, शहराध्यक्ष दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, रमेश काळे, सौरभ देशमुख, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे, तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, श्रीकांत गोमासे, गोकुळ दिघे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते



साहीत्य कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.मंत्री उदय सामंत म्हणाले की निवडून आल्यानंतर आ. अमोल खताळ यांनी कलावंताची दखल घेवून एका कलावंताचा गौरव करण्याचा कार्यक्रम घेऊन आमच्या पुढे एक आदर्श निर्माण केला आहे. हा सन्मान एकट्या आवळे मास्तर यांचा नसून राज्यातील सर्व लोक कलावंताचा आहे. यापुर्वी असे काम तालुक्यामध्ये झाले नाही. पण तुम्ही अमोल खताळ यांच्या रुपाने निवडून दिलेल्या लोकप्रतिनीधीने कलावंताचा केलेला सन्मान सोहळा पाहीला तर तुम्हा सर्व मतदारांचे सुध्दा कौतुक असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की संगमनेर तालुका कलावंताची खाण आहे. यापुर्वी कोणत्याच कलाकराचा असा सन्मान झाला नाही. परंतू अमोल खताळ यांच्या माध्यमातून झालेला हा सन्मान सोहळा तालुक्याची नवी ओळख निर्माण करणारा ठरला असल्याचे सांगून लोककलेची जोपसाना करणार्या या कलाकवंतांनी स्वताचे दुख बाजूला ठेवून समाजाला आनंद देण्याचा प्रयत्न केला आहे.बाकीचे उद्योग तालुक्यात आता बंद झाल्याचा टोला लगावून मंत्री विखे पाटील यांनी आ.अमोल खताळ यांनी औद्यगिक वसाहतीसाठी केलेल्या मागणीला पाठींबा देवून तालुक्यात लवकर औद्यगिक वसाहत येण्याच्या दृष्टीने दृष्टीने आपणही पाठपुरावा करू. जिल्ह्याला असलेला साहीत्य कला आणि सांस्कृतिक वारसा पाहाता आम्हाला मराठी भाषा व सांस्कृतिक भवन उभारणीसाठी आम्ही जागा उपलब्ध करून देवू तुम्ही निधी द्यावा अशी मागणी केली. आमदार.अमोल खताळ यांनी या पुरस्काराच्या निमिताने तालुक्यात नव साहीत्य सांस्कृतिक पर्व निर्माण करण्याचा प्रयत्न असून दरवर्षी तालुक्यातील एका लोक कलावंताच्या नावाने आम्ही पुरस्कार देण्याचे नियोजन केले आहे. तालुक्यात रोजगार निर्माण करून देण्याच्या दृष्टीने यापुर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औद्यगिक वसाहतीची केलेल्या घोषणेला मंत्री उदय सामंत यांनी मूर्त स्वरूप देण्याची मागणी केली.

## द • ख • ल

### बिबट्याकडून थेटे वस्तीवर पाळीव कुत्र्याची शिकार

**झरेकाठी :** राहता तालुक्यातील प्रवरानगर प्रवरा कारखाना शेजारील गणेश रवींद्र थेटे यांच्या वस्तीवर गट नंबर १९५ मध्ये गणेश रवींद्र थेटे यांच्या फार्म हाऊससमोर बिबट्याने पाळीव बिट्टू नावाच्या कुत्र्याची शिकार केली असून त्याचा व्हिडिओ सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. थेटे वस्तीवरील नाना (रवींद्र) पाटील थेटे, गणेश गरगडे, परसराम थेटे, संदेश थेटे, प्रवीण गरगडे, अमोल थेटे, मनोज थेटे, योगेश थेटे, केशव थेटे, मंजाबापू थेटे या शेतकऱ्यांनी बिबट्या पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी वनविभागाकडे केली आहे. तसेच बिबट्याचा शोध घेण्याबाबतही वनविभागाकडे मागणी करण्यात येणार आहे की वनविभागामार्फत पिंजरा लावून बिबट्याचा शोध घेण्यात यावा.

### तक्षशिला विद्यालयाला 'टॉप स्कूल ऑफ द इयर' पुरस्कार

**बालाजी देडगाव :** देडगाव येथील तक्षशिला इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज या विद्यालयाला शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'टॉप स्कूल ऑफ द इयर' हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (-ख) वापर, कौशल्य विकास कार्यक्रम आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण प्रगती या निकषांवर तक्षशिला विद्यालयाची निवड झाली. हा पुरस्कार रोबोचॅम्प्स, रोबोवंडर आणि किड्स इंटरप्रिनरशिप डेव्हलपमेंट अकॅडमी (दिल्ली) या संस्थांकडून दिला गेला. दिल्ली येथे रोबोचॅम्प संस्थेचे संचालक अभिषेक आहुजा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. मन्वंतर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विजय कदम यांनी विद्यालयाच्या वतीने पुरस्कार स्वीकारला.

### गुंदेचा परिवाराचे भास्करगिरी बाबांनी केले सांत्वन



**नेवासा :** नगर शहरातील कापड बाजारातील नंदू-बंधू इमारत कंपनी येथील रहिवासी सौ. मनिषा विजय गुंदेचा (वय ५८) यांचे हृदयविकाराने निधन झाले. नंदू बंधू फर्मचे संचालक व दत्त भक्त विजय गुंदेचा यांच्या त्या पत्नी होत.देवगड देवस्थानचे महंत गुरुवर्य हभप भास्करगिरीजी महाराज यांनी गुंदेचा परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले. कै.सौ.मनिषा गुंदेचा यांना धार्मिक कार्याची आवड होती. त्यांनी दत्त गुरुंची सेवा करून पुण्य मिळवले होते. गुंदेचा परिवाराचा धार्मिक कार्यात नेहमी सहभाग असतो. भगवान श्री दत्तात्रय महाराज गुंदेचा परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती देईल असे सांगून भास्करगिरी बाबांनी श्रद्धांजली अर्पित केली.

## शनिचरणी वीस लाखांचे दान
### कॅमेऱ्याच्या नियंत्रणात १८ दान पेट्या उघडल्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील दानपेट्यांतील रक्कम मोजणीचे काम धर्मदाय आयुक्त कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या व्यस्ततेमुळे आठ दिवस विलंबाने पार पडले. अखेर पंधरा दिवसांनंतर शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नियंत्रणाखाली १८ दानपेट्या उघडण्यात आल्या.



या मोजदादीत शनि भक्तांनी दिलेली २० लाख ५६ हजार ८७८ रुपयांची रोख रक्कम तसेच सुवर्ण आणि मौल्यवान वस्तू आढळल्या असल्याची माहिती देवस्थानचे प्रशासक व प्रशासकीय अधिकारी यांनी दिली.दानपेट्यांचे उघडण्याचे काम उदासी महाराज मठात कर्मचाऱ्यांच्या मदतीने करण्यात आले. या वेळी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे, सचिव राजेंद्र वाकचौरे तसेच समिती सदस्य उपस्थित होते. मोजलेली संपूर्ण रक्कम प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार देवस्थानच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.दीपावली निमित्त शनिशिंगणापूर येथे भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, राहुरी-शिर्डी-शिंगणापूर मार्गावरील वाहतूकही वाढली आहे. शनिभक्तांनी भरभरून गुप्त दान करून आपली श्रद्धा व्यक्त केली आहे.

## पाटबंधारे खात्याकडून पुलांच्या दुरुस्तीच्या कामांना सुरुवात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** परिसरातील जळगाव चितळी हद्दीतील गोदावरी उजव्या कालव्यावरील पुलांच्या दुरुस्तीचे काम पाटबंधारे खात्याकडून सुरू झाले आहे. मागील दोन दिवसांपासून ही कामे युद्धपातळीवर सुरू असून, जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने या कामांना गती मिळाली आहे.



अस्तगाव माथ्यापासून गोदावरी उजव्या कालव्याचे तसेच वितरिका क्रमांक २० चे दुरुस्तीकरण, मजबुतीकरण आणि खोलीकरणाची कामे मे महिन्यातच सुरू झाली होती. त्या अनुषंगाने गोदावरी उजव्या कालव्यावर रेल्वेच्या लोखंडी पुलापर्यंतचे काम पूर्ण करण्यात आले आहे.कालव्यावरील काही जुन्या पुलांचे संरचनात्मक मजबुतीकरण व दुरुस्ती अत्याधुनिक साधनांच्या साहाय्याने करण्यात येत आहे. सध्या तीन पुलांच्या दुरुस्तीची कामे सुरू असून, ही कामे बारामती येथील एका नामांकित कंपनीमार्फत केली जात असल्याची अनौपचारिक चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. या कामांमुळे परिसरातील सिंचन व्यवस्थेला अधिक स्थैर्य आणि सुरक्षितता मिळणार असल्याचे पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## मंत्री उदय सामंत यांची कवी अनंत फंदी नाट्यगृहाला भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** आमदार सत्यजित तांबे व संगमनेर नाट्यपरिषद यांच्या मागणीनुसार राज्याचे उद्योग व भाषा मंत्री उदय सामंत यांनी संगमनेर येथील कवी अनंत फंदी खुले नाट्यगृह पाहणीसाठी भेट दिली. नाट्यगृह अधिक सुसज्ज व्हावे यासाठी आवश्यक मदत करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.



लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहरात उभारण्यात आलेले हे भव्य नाट्यगृह सध्या अंतिम टप्प्यात आहे. नगरपालिकेच्या माध्यमातून साडेतीन कोटींचा निधी उभारण्यात आला असून, महसूल मंत्री म्हणून काम पाहत असताना थोरात यांनी नगरविकास विभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत बंदिस्त नाट्यगृहासाठी ७.९९ कोटींचा निधी मंजूर करून घेतला होता.भाषा मंत्री उदय सामंत यांच्या भेटीप्रसंगी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी धनश्री पवार, प्रा. डॉ. संजय दळवी, संगमनेर नाट्यपरिषदेचे विश्वस्त व रंगकर्मी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. दळवी यांनी प्रास्ताविक करून नाट्यगृहाच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली.मंत्री सामंत म्हणाले, कवी अनंत फंदी नाट्यगृह हे अत्यंत आधुनिक आणि शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकणारे ठरणार आहे. स्थानिक प्रशासनाने रंगकर्मींच्या सूचना घेत काम अधिक परिपूर्ण करावे. आवश्यक त्या सर्व सोयी व निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू.

## समस्या सोडविण्यासाठी शेतकरी संघटना तुमच्या पाठिशी : ॲड.काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** वैजापूर तालूक्यातील वीज प्रश्न, नांदूर मदमेश्वर प्रश्न, तहसिल, तलाठी, कृषी कार्यालयातील समस्या असूद्या त्या सर्व समस्या सोडविण्यासाठी शेतकरी संघटना तुमच्या पाठिशी खंबीरपणे उभी राहिन अशी ग्वाही शेतकरी संघटनेचे राज्य प्रदेश उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी दिली.

मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळख असलेल्या छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील चेंडूफळ येथे शेतकरी संघटनेच्या शाखेची स्थपना करण्यात आली असून या शाखेचे उदघाटन ड. अजित काळे यांचे हस्ते करण्यात आले यावेळी काळे बोलत होते.यावेळी अहिल्यानगर जिल्हा, श्रीरामपूर, राहुरी नेवासा येथील पदाधिकारी तसेच वैजापूर तालुक्यातील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाखा उद्घाटन प्रसंगी आलेल्या सर्व मान्यवरांचे चेंडूफळ येथील शेतकरी संघटनेच्या युवा कार्यकर्त्यांनी आभार मानले.

## राहूरीत बुधवारी भाजप-महायुतीचा निर्धार मेळावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी येथे बुधवार दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता पांडुरंग मंगल कार्यालयात महायुती कार्यकर्त्यांचा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.स्व शिवाजीराव कर्डिले यांच्या अकस्मात निधनाने कार्यकर्त्यांसह कर्डिले कुटूंबियांना मोठा धक्का बसला असून यामध्ये स्व. शिवाजीराव कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांच्या बरोबरच राहून आगामी होणाऱ्या सर्वच निवडणुकांना सामोरे जाऊन अक्षय कर्डिले यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहण्याचा निर्धार भाजपाचे ज्येष्ठ नेते व कार्यकर्त्यांकडून करण्यात येणार आहे.



आयोजित केलेल्या या मेळाव्यात राज्यमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप हे उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार असून स्व. शिवाजीराव कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले हेही यावेळी मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे महायुतीच्या या निर्धार मेळाव्यात कार्यकर्त्यांना नवसंजीवनी मिळणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

या मेळाव्याच्या संदर्भाने झालेल्या बैठकीत भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल भनगडे, ज्येष्ठ नेते उत्तमराव म्हसे, माजी तालुकाध्यक्ष सुरेश बानकर, श्यामराव निमसे, विक्रम भुजाडी ,अक्षय भुजाडी, भैय्यासाहेब शेळके, राजेंद्र उंडे, युवराज गाडे, गोरक्षनाथ तारडे, अक्षय तनपुरे आबासाहेब येवले, रवींद्र म्हसे ,नारायण धोंगडे ,सचिन मेहेत्रे, सतीश फुलसौंदर,अनिल पवार, नयन सिंगी, नितीन ढेरे, भारत भुजाडी, सचिन पानसंबळ शरद किनकर योगेश गीते उमेश शेळके सुजय काळे अरुण डौले, राजेंद्र वराळे, सोपान गागरे ,अनिल आढाव, अप्पासाहेब नेहे, सोमनाथ वामन, यांच्यासह मनोज गव्हाणे हे या बैठकीला उपस्थित होते.

## गणेगावला 'ग्राम स्वच्छता' पुरस्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०२३-२४अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात आली होती. सदर अभियानाचा जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार राहुरी तालुक्यातील आदर्श गाव गणेगाव या गावाला प्राप्त झाला असून विशेष पुरस्कारामध्ये देसवंडी गावाला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.




यामध्ये जिल्हास्तरावर प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतची निवड करण्यात आलेली आहे तसेच विशेष पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीची देखील निवड करण्यात आलेली आहे. आदर्श गाव गणेगावला यामध्ये जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.विशेष पुरस्कारामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन यामध्ये देसवंडी गावाला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. राहुरी तालुक्यातील आदर्श गाव गणेगाव या गावाने जिल्हा स्तर, विभाग स्तर तसेच राज्य स्तरावर शासनाचे विविध पुरस्कार प्राप्त केल्याने तालुक्यातून समाधान व्यक्त होत आहे.

पुरस्कार प्राप्त गावांना आमदार स्व,शिवाजीराव कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ, गटविकास अधिकारी सुरेश तायडे, ग्रामविस्तार अधिकारी तानाजी कोकाटे, राहुरी पंचायत समिती स्वच्छता कक्ष अधिकारी व कर्मचारी यांचे मार्गदर्शन, सहकार्य लाभले. सदर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आदर्श गाव गणेगावच्या सरपंच सौ.शोभाताई अमोल भनगडे, ग्रामसेविका अर्चना हारदे, देसवंडीच्या सरपंच सौ.योगिता नितीन कल्हापुरे यांच्यासह सदस्य, ग्रामसेवक व ग्रामस्थांचे जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील, युवा नेते अक्षय कर्डिले, भाजपा जिल्हा सरचिटणीस अमोल भनगडे, मनसे नेते नितीन कल्हापुरे आदींनी अभिनंदन केले आहे.

## ५० अंगणवाड्यांचा स्मार्ट अंगणवाडी योजनेत समावेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यात स्वमालकीच्या ५० अंगण वाड्यांचा स्मार्ट अंगणवाडी योजनेत समावेश करण्यात आले असल्याची माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली.




महिला व बाल विकास विभागाने संपूर्ण राज्यातील ५,हजार ४६९ अंगणवाड्यांना स्मार्ट अंगणवाडी किट उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली आहे. त्यात संगमनेर विधानसभा मतदारसंघातील ५० अंगण वाड्यांचा समावेश केला आहे. त्यामुळे संगमनेर तालुक्यातील पूर्व प्राथमिक शिक्षण व बालविकास क्षेत्रामध्ये मोठे पाऊल उचलले गेले आहे. या किटमुळे स्थानिक अंगणवाड्यां मध्ये मुलांसाठी सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल

राज्य शासनाने स्मार्ट अंगणवाडी योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून मुलांना देण्यात येणाऱ्या किटमध्ये शिक्षण, साहित्य, कौशल्य विकास साधने, आरोग्य व पोषणाशी संबंधित साहित्य, मुलांच्या अंगभूत कुतूहलाला चालना देणाऱ्या खेळणी व दृश्य-श्राव्य साधने समाविष्ट आहेत. यामुळे संगमनेरमधील मुलांना मोठ्या शहरांमध्ये मिळणाऱ्या समकक्ष सुविधा उपलब्ध होणार असून ग्रामीण भागातही आधुनिक शिक्षण संस्कृती रुजण्यास मदत होईल.या योजनेच्या अंमलबजावणी मध्ये पारदर्शकता व गुणवत्ता तपासणीवर विशेष भर देण्यात आला असून पात्र अंगणवाड्यांची यादी निश्चित करून त्या केंद्रांमध्ये किटचे वितरण केले जाणार आहे. पुरवठ्याची नोंदवही, साहित्याची गुणवत्ता आणि उपलब्धता याची तपासणी बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत केली जाईल. त्यासोबतच प्रत्येक केंद्रात हे साहित्य नियमित वापरले जाईल यासाठीच्या मार्गदर्शक सूचना दिल्या जातील.

या निर्णयामुळे अंगणवाड्यांची पायाभूत सुविधा मजबूत होईल, तसेच मुलांमध्ये शिकण्याची उत्सुकता वाढेल, तसेच केंद्रांमध्ये कौशल्य प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविणे सोपे होईल. आमदार अमोल खताळ यांनी या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्य मंत्री अजित पवार , महिला, आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

संगमनेरमधील मुलांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी सक्षम शिक्षण व पोषण सुविधा देणे ही काळाची गरज आहे. 'स्मार्ट अंगणवाडी किट' उपलब्ध झाल्या मुळे आपल्या केंद्रांमध्ये आधुनिक सोयी निर्माण होतील अन मुलांना शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी बनेल. संगमनेरच्या विकासासाठी ही अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. याबद्दल महिला व बाल विकास विभागाचे आभार.संगमनेर मध्ये बाल विकास क्षेत्रातील गुणवत्ता आणखी उंचावण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत राहू.

**-अमोल खताळ, आमदार संगमनेर विधानसभा**

### स्मार्ट अंगणवाडीमध्ये समाविष्ट असलेली प्रमुख केंद्रे

धांदरफळ खुर्द, माणकेश्वर मळा, गोडसेवाडी, मिर्झापुर, उबरमळा, खटकाळी, दत्तमळा, पाटीलडरा (मिनी), येळूशीवाडी, सावरचोळ-चंदनदरा, सांगवी बिरोबावस्ती, बेटवस्ती, श्रमिक नगर, जवळेकडलग बिरोबावस्ती, साबळेवस्ती, धांदरफळ बु.-डेरेवाडी, धांदरफळ बु.-२, कोकणेवाडी, पिंपळगाव कोझिरा-वाळुंजवस्ती, वडगाव लांडगा, बोऱ्हाडे मळा, कानवडे मळा, रायते-रायते फाटा, वाघापुर, देवगाव, कोटकरवस्ती, राजापूर-देशमुख खातोडे आखाडा, खंदक आखाडा, निमगाव भोजापूर, चिकणी-वर्षेवस्ती, कासारा दुमाला-सावंतवस्ती, मंगळापूर, चिखली दत्तमळा, समनापूर, मानकुबाबा, सुकेवाडी, गणपतीमळा, कानिफनाथ वस्ती, खांजापूर-अग्नेश्वर, वेल्हाळे, हरीबाबावस्ती आणि भांडमळा या अंगणवाड्यांचा स्मार्ट अंगणवाडी मध्ये समावेश करण्यात आला आहे.

## प्रतिज्ञापत्र

मा. नोटरी पब्लीक साहेब श्रीरामपुर याचे समोर

**प्रतिज्ञापत्र लिहुन देणार...**

**१) भाऊसाहेब दिनकर कोकणे,** वय ५५ वर्ष धंदा शेती,
रा. टाकळीभान, ता.श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर

**२) सौ. सरिता गजानन सदाफळ,** वय ५६ वर्ष, धंदा घरकाम,
रा. पिंपळवाडी रोड, राहाता, जि. अहिल्यानगर,

कारणे सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र लिहुन देतो की, आम्ही मौजे मजकुर येथील रहिवासी असून आमची आई नामे कै. कमलबाई दिनकर कोकणे यांचे नावे इंडीगो ईसीएस टाटा मोटर्स या कंपनीची व्हाईट कार असुन तीचा रजि. नंबर एमएच १७ एजे २८२५ सन २०११ हिचा चेसी नंबर एमएटी ६०१४६५ बीडब्ल्यु एन ३३४२९ या प्रमाणे आहे. आमची आई दिनांक १९/०६/२०१९ रोजी टाकळीभान येथे मयत झालेली असुन त्यांचे आम्ही कायदेशीर वारस आहोत. तरी कायद्याने आम्ही सदर गाडीचे मालक आहोत. सदर गाडीची मा. मोटार वाहन निरीक्षक उ. प्रा. परिवहन श्रीरामपुर यांचे कार्यालयात नोंदणी करावयाची आहे.०

आमचे पैकी नंबर २ नामे सौ. सरिता गजानन सदाफळ यांनी लिहुन देणार नंबर १ नामे भाऊसाहेब दिनकर कोकणे यांना सदरची गाडी आमचे पैकी नंबर १ नामे भाऊसाहेब दिनकर कोकणे यांचे नावे नोंदणी करणेकामी संमती दिलेली असुन सरिता गजानन सदाफळ यांची भाऊसाहेब दिनकर कोकणे यांचे नावाने गाडीची नोंदणी करणेकामी काही एक हरकत अथवा तक्रार नाही. तसेच भाविष्यात सदर गाडीचे नोंदणीबाबत काही वाद उपस्थित झाल्यास त्याची सर्वस्वी जबादारी आमची व आमचे वाली वारसांची राहील. तसेच मयत कमलबाई दिनकर कोकणे यांना त्यांचे मृत्युपश्चात भाऊसाहेब दिनकर कोकणे (मुलगा), सरिता गजानन सदाफळ (मुलगी) व विजय दिनकर कोकणे (मुलगा) असे कायदेशीर वारस असुन यांचेव्यतिरीक्त त्यांना इतर कोणीही वारस नाही. तसेच सदर गाडीची नोंदणी भाऊसाहेब दिनकर कोकणे यांचे नावावर होणेकरीता मयत कमलाबाई दिनकर कोकणे यांचे एक मुलगा नामे विजय दिनकर कोकणे यांनी यापुर्वीच भाऊसाहेब दिनकर कोकणे यांना दिनांक २१/०५/२०२५ रोजीच संमतीपत्र लिहून नोंदवुन दिलेले असुन त्याची सदर बाबत काही एक तक्रार अथवा हरकत राहीलेली नाही. तरी सदर गाडीची नोंदणी भाऊसाहेब दिनकर कोकणे यांचे नावे करण्यात यावी करीता आम्ही हे प्रतिज्ञापत्र लिहुन नोंदवुन देत आहोत. तरी वर दिलेली सर्व माहीती खरी असुन खोटी आढळुन आल्यास भारतीय दंड सहीता २३६,२३७, २२९ प्रमाणे होणाऱ्या शिक्षेस मी पात्र राहील याची आम्हाला जाणीव आहे. याबाबत कोणाची हरकत असल्यास आठ दिवसाच्या आरटीओ कार्यालय या ठिकाणी सूचना करावी.

श्रीरामपुर
दिनांक ०३/०५/२०२५

**प्रतिज्ञापत्र करुन देणार**

## पान १ वरुन

### स्थानिकांच्या रोजगाराला प्राधान्य

निधीतून उभारलेल्या शिर्डी विमानतळाचा विस्तार सध्या सुरू आहे. या विस्तारासाठी शासनाने ६०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. विमानतळामुळे शिर्डी परिसराच्या आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळाली आहे.राज्यात मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य विकास विभाग उत्कृष्ट कार्य करीत आहे. या केंद्रातून दरवर्षी ७ हजार कामगारांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. संरक्षण कारखान्यासाठी १०५२ प्रशिक्षित युवकांची गरज असून, त्यापैकी ५०० आयटीआय शिक्षित तरुणांची आवश्यकता आहे. पुढील दहा वर्षांत कौशल्य आणि तांत्रिक शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे, असे डॉ. विखे पाटील म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. सध्या राहाता येथे खासगी इमारतीत कार्यरत असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी शासनाने सावळी विहीर येथील शिर्डी औद्योगिक वसाहतीत २ एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. या ठिकाणी आयटीआय आणि कार्यशाळेची सुसज्ज इमारत उभारण्यासाठी शासनाने साडेआठ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामुळे संस्थेतील व्यवसाय शाखांची संख्या एकवरून चारपर्यंत वाढणार असून, विद्यार्थ्यांची क्षमता २४ वरून १४४ पर्यंत वाढेल, असे ते म्हणाले.

### भरदिवसा बिबट्याचा हल्ला ; १३ वर्षीय रोहन ठार

वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या वीस दिवसांत बिबट्यांच्या हल्ल्याच्या तीन घटना घडल्या असूनही वनविभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. ग्रामस्थांनी स्पष्ट चेतावणी दिली आहे की, ठोस निर्णय न झाल्यास मुलाचे शवविच्छेदन होणार नाही.

### कार्तिकी एकादशीनिमित्त आयोजित कीर्तन सोहळा



**नेवासा** : कार्तिकी एकादशीचे औचित्य साधून वारकरी संप्रदायातील सेवेकरी कै. सौ. शारदादेवी नन्नवरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित किर्तन सोहळ्यास भाविकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. हा सोहळा सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

आराध्या मंगल कार्यालयात झालेल्या या किर्तन सोहळ्यात बोलताना महंत उद्धवजी महाराज मंडलिक म्हणाले की, जीवाला काळाच्या तडाख्यातून सोडवण्यासाठी भगवंताची भक्ती आणि संतसंगती हाच खरा उपाय आहे. संतसंगतीत राहून भगवंताची सेवा करा, कारण भक्ती आनंदात संयम आणि दुःखात आधार देते. महंतांनी पुढे सांगितले की, कै. शारदादेवी नन्नवरे यांनी शेवटच्या श्वासापर्यंत धर्मकार्य, अन्नदान आणि भजनसेवा करून वारकरी संप्रदायासाठी मोठे योगदान दिले. त्यांचे जीवन हे स्त्रीशक्ती आणि भक्तीचा आदर्श आहे, असे ते म्हणाले.

या सोहळ्यात श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानाचे विश्वस्त वेदांताचार्य ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के, श्रीराम साधना आश्रमाचे महंत सुनीलगिरी महाराज, त्रिवेणीश्वर देवस्थानाचे महंत रमेशानंदगिरी महाराज, रामकृष्ण आश्रमाचे ह.भ.प. भगवान महाराज जंगले शास्त्री, रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, भागवताचार्य ह.भ.प. अंकुश महाराज जगताप, तसेच अनेक संत-महंत उपस्थित होते.

### शेवगावच्या पाणीपुरवठा योजनेची प्रेशर टेस्ट फसली!

**अमरापूर/शेवगाव :** शेवगाव नगरपरिषदेच्या नवीन पाणीपुरवठा योजनेची शनिवारी झालेली प्रेशर टेस्टिंग पूर्णपणे फसली असून, या परीक्षणामुळे योजनेतील गंभीर त्रुटी उघड झाल्या आहेत. प्रभाग क्र. ६ मधील शास्त्रीनगर भागात केवळ ९० नळ कनेक्शनसाठी घेतलेल्या टेस्टिंगमध्ये अत्यंत कमी दाबाने पाणी येत असल्याचे स्पष्ट झाले. **९० नळांनाच दाब नाही; पुढे काय होणार?**

एका वॉलवर केवळ ९० नळांसाठीच पुरेसं प्रेशर मिळालं नाही, तर पुढे ७०० ते ८०० नळ कनेक्शन झाल्यानंतर स्थिती कशी असेल, असा प्रश्न सर्वपक्षीय पाणीपुरवठा कृती समितीने उपस्थित केला. या त्रुटींमुळे नगरपरिषदेच्या लाखो रुपयांच्या योजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

# दुय्यम निबंधक कार्यालयात वरिष्ठांच्या आशीर्वादाने बेकायदेशीर दस्त नोंदणीचा सपाटा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**गंगापूर** : गंगापूर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात वरिष्ठांच्या आशीर्वादाने नोंदणी व महसूल विभागाच्या नियमांना फाटा देत अवैध दस्त नोंदणी सुरुच असून दुय्यम निबंधक हे वरिष्ठांना न जुमानता अवैधरीत्या दस्त नोंदणी करून शासनाचा लाखो रुपये महसूल बुडवीत आहे. होत असलेल्या गैरकारभाराची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून दोषी अधिकारी यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

गंगापूर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दुय्यम निबंधक हे गेल्या अनेक दिवसांपासून वरिष्ठांच्या मिलीभगतमुळे नोंदणी अधिनियमास पायदळी तुडवून नियमबाह्य दस्त नोंदणी करण्याचा जणू सपाटाच लावला असून दुय्यम निबंधक यांचे वरिष्ठ स्तरावर लागेबांधे असल्याने बिनधास्त दस्त नोंदणी सुरू असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

दुय्यम निबंधक यांनी तालुक्यातील जमीनीचे मुद्रांक शुल्क जास्त असताना कमी दाखवून तसेच कुळाची नोंद यासह आदींची बेकायदेशीर दस्त नोंदणी मोठ्या प्रमाणात करुन शासनाचा लाखो रुपयांचा महसूलला तिलांजली दिल्याने यास जबाबदार कोण असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे दुय्यम निबंधक यांनी एक प्रकारे हुकुमशाही चालवत असल्याचा अरोप नागरिकांमधून होत आहे.

दुय्यम निबंधक कार्यालयात होत असलेल्या बेकायदेशीर दस्त नोंदणी करणाऱ्या अधिकारी यांची उच्चस्तरीय चौकशी करून निलंबित करावे व आतापर्यंत मुद्रांक शुल्क कमी दाखवून जमिनीची दस्त नोंदणी केल्याने लाखो रुपयांचा महसुल बुडवला याची चौकशी करून महसुल बुडवल्याची वसुली करण्यात यावी नियमबाह्य दस्त नोंदणी बंद करण्यात यावी संबंधित सह दुय्यम निबंधक यांना निलंबित करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

गंगापूर येथील दुय्यम निबंधक यांनी तालुक्यातील जमीन व प्लॉट तसेच सहन जागा यांचे मुद्रांक शुल्क जास्त असताना कमी दाखवून तसेच कुळाची नोंद यासह आदींची बेकायदेशीर दस्त नोंदणी मोठ्या प्रमाणात करुन शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवला याची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकारी यांना निलंबित करावे व नियमबाह्य दस्त नोंदणी बंद करावी.बंद न केल्यास सह जिल्हा निबंधक यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करणार.

--विजय शिनगारे –
बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी जिल्हा अध्यक्ष,

# मुठेवाडगांवमध्ये शेतकरी संघटनेची शाखा स्थापना

## तरुण शेतकऱ्यांचा उत्साह

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीच्या पिकांचे न्याय्य भाव मिळावे यासाठी मुठेवाडगांव येथे शेतकरी संघटनेची नवीन शाखा स्थापन करण्यात आली. या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड अजित काळे उपस्थित होते आणि त्यांनी उत्साही सभेत शेतकऱ्यांशी संवाद साधला.

ते म्हणाले की, आपल्या वडिलांनी कष्टाने शेती केली, पण राजकीय पक्षांनी आपला उपयोग केला आणि प्रतिफळ फार कमी मिळाले. आता शेतकऱ्यांचे मोठे व लहान भाव जागृत होऊन संघटनेच्या प्रवाहात सामील होत आहेत. संघटनेत कुणी लहान, कुणी मोठा भेदभाव नाही; प्रत्येक तरुणाचा सहभाग संघटनेची ताकद वाढवतो.

शेतकरी संघटनेच्या शाखेच्या फलकाचे अनावरण ॲड अजित काळे यांच्या हस्ते प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यांनी शेतकऱ्यांना प्रामाणिक मेहनतीच्या पिकांचे योग्य भाव मिळविण्यासाठी संघटनेत सक्रिय होण्याचे आवाहन केले.

त्यांनी पुढे सांगितले की, पूर्वी स्व. शरद जोशी यांच्या काळात संघटनेवर राजकीय स्वार्थासाठी आघात केला गेला, पण रघुनाथदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली संघटना पुन्हा गती मिळवत आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संघटना ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि साखर कारखाना निवडणुकांत सक्रिय होणार आहे.

या प्रसंगी रूपेश काले, ॲड सर्जेराव घोडे, ॲड दिलीप मुठे सरपंच सागर मुठे, साहेबरांव चोरमल यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच गोविंद वाघ, बंडूनाना चौगुले, शेरकर, सरोदे, सोपन नाईक, शिवाजी पटारे, संजय वमने, सचिन वेताळ, बबनरांव नाईक यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

शाखेचे अध्यक्षपदी संतोष साहेबरांव मुठे यांची सर्वानुमते निवड झाली. सरपंच सागर मुठे आणि इतर प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांनी छातीवर बिल्ले लावून संघटनेच्या प्रवाहात सामील होण्याची शपथ घेतली.

### बिबट्याच्या तोंडातून पाळीव कुत्रा वाचवला; तरुणाचे कौतुक

**सोनई** : नेवासा तालुक्यातील पानसवाडी येथील जोगदे वस्तीवर रात्री दोन वाजता घरासमोर पाळीव कुत्र्यावर बिबट्याने हल्ला केला. कुत्र्याच्या प्रचंड आवाजाने घरमालक अभय जोगदे जागे झाले आणि त्यांनी बाहेर पळत येऊन घटनेचे निरीक्षण केले.

अभय जोगदे यांनी लगेच लाकडी दांड्याने बिबट्याकडे धाव घेतली, ज्यामुळे बिबट्याने कुत्रा सोडून पिकात धूम टाकली. त्यावेळी कुत्रा जखमी झाला आणि त्यावर औषधोपचार करून उपचार केले जात आहेत.

या शौर्याबद्दल अभय जोगदे यांचे गावकऱ्यांकडून कौतुक केले जात आहे.

दरम्यान, या भागात बिबट्याचा वावर दिवसेंदिवस वाढत असल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये घाबराट निर्माण झाला आहे. यापूर्वी जाधव वस्तीवर बिबट्याने हल्ला करून अनेक शेळ्यांचा फडशा पाडला होता. त्यामुळे या परिसरातील नागरिक रात्री आठ वाजल्यावर घराबाहेर पडायला घाबरत आहेत. शेतकरी अरुण जोगदे यांनी संबंधित वन खात्याकडे याकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे.

# पदवीधर शिक्षकांच्या वेतनातील त्रुटी होणार दूर;शिक्षकांना मिळणार लाभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** सातवा वेतन आयोग वेतननिश्चिती करताना सहाय्यक शिक्षकांचे वेतन एस-१३ मध्ये व पदवीधर शिक्षकांचे वेतन एस-१४ मध्ये निश्चित करताना सहाय्यक शिक्षकांपेक्षा पदवीधर शिक्षकांचे मूळ वेतन १०० रुपयांनी कमी होत असल्याची त्रुटी शिक्षक सेनेच्या माध्यमातून शासनाकडे व वेतनत्रुटी निवारण समितीच्या निदर्शनात आणून देण्यात आलेली होती. याची दखल घेऊन वेतनत्रुटी निवारण समितीच्या शिफारशीनुसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग व ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार अशा शिक्षकांची त्याच वेतनश्रेणीतील पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

यानुसार जिल्हा परिषद पुणे, जिल्हा परिषद रत्नागिरी व राज्यातील इतर काही जिल्हा परिषदांनी सदरील वेतनत्रुटी दूर करत पदवीधर शिक्षकांना त्याच वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेकडून योग्य ती कार्यवाही न झाल्यामुळे शेकडो शिक्षक यापासून वंचित राहिलेले होते.

याबाबत शिक्षक सेनेकडून जिल्हास्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू होता. अखेरीस या पाठपुराव्यास यश मिळालेले असून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून याबाबत गटशिक्षणाधिकारी यांना शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे पत्र निर्गमित करण्यात आले आहे.

याबाबत प्राथमिक शिक्षक सेना राज्य सरचिटणीस दीपक पवार, राज्य उपाध्यक्ष सोमनाथ जगदाळे, राज्य प्रसिद्धीप्रमुख महेश लबडे,राज्य सल्लागार लक्ष्मण ठुबे, विभागीय उपाध्यक्ष अनिल काळे, विभागीय सल्लागार शिवाजी कुमावत, जिल्हा संपर्कप्रमुख कल्याण पवार, जिल्हाप्रमुख अमोल एरंडे, जिल्हा सरचिटणीस भगवान हिवाळे, कार्याध्यक्ष काशिनाथ वसईकर,

जिल्हा उपाध्यक्ष दीपक साबळे, संदीप चव्हाण, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख उद्धव बोचरे, गंगापूर तालुका संपर्कप्रमुख कैलास गायके, तालुकाध्यक्ष राजेंद्र बोल्डे, सरचिटणीस सचिन साळुंके, कार्याध्यक्ष निलेश कहाटे, कोषाध्यक्ष योगेश दांगुर्डे, तालुका प्रसिद्धीप्रमुख जावेद पटेल, उपाध्यक्ष भास्कर आढाव, सुभाष पल्हाळ, जयेश भालेराव आदींनी प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाबद्दल आभार मानले आहेत.

## निधन वार्ता..

### सुभद्राबाई शिंदे



**करंजी** : दगडवाडी ता. पाथर्डी येथील सौ सुभद्राबाई सोपानराव शिंदे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पती , मुलगा , मुलगी , सुना, नातवंडे असा परिवार आहे. निवृत्त सैनिक सोपान शिंदे यांच्या त्या पत्नी होत.सुभद्राबाई परिसरामध्ये अक्का म्हणून परिचित होत्या. अत्यंत धार्मिक वृत्तीच्या सुभद्राबाईच्या निधनामुळे परिसरामध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### उद्योजक विजय सेठींकडून डॉ.तनपुरे कारखान्यासाठी एक कोटींचा धनादेश



**राहुरी** : राहुरी येथील डॉ.बाबुराव बाबुराव तनपुरे सहकारी साखर कारखाना हे आमचे कुटुंबिय आहे,आमचे बालपण येथे गेले या कारखान्याचे गतवैभव आम्ही बघितले होते, गेलेले गतवैभव परत मिळावे अशी आमच्या वडिलांची इच्छा होती, म्हणून आज आम्ही एक कोटी रूपयांची मुदत ठेव देत आहोत, आपण या कारखान्याचे गतवैभव परत मिळवून द्या, आम्ही निस्वार्थ तुमच्या बरोबर आहोत,अशी भावनिक साद उद्योजक विजय सेठी यांनी घातली.

काल रविवारी सायंकाळी राहुरी येथील उद्योजक विजय सेठी यांच्या निवासस्थावर डॉ.तनपुरे कारखाण्यासाठी कारखान्याचे अध्यक्ष अरूण तनपुरे यांच्याकडे एक कोटी रूपयांची मुदत ठेवीची धनादेश सुपुर्त करत सर्वांनाच एक सुखद धक्का दिला आहे.

आमचे वडील येथे कपड्यानिशी आले होते, तनपुरे कुटुंबीय आमचे पालक होते, त्यामुळे या कारखान्याचे गतवैभव आम्ही बघितलेले आहे,मात्र आहे याची अवस्था बघुन खुप दुखः होते, म्हणून आम्ही भुमिपुत्राने मागितले नाही पाहीजे ,तर दिले देखील पाहीजे या भावनेतुन हा खारीचा वाटा उचलला असल्याचे सेठी यांनी सांगितले,,,,, प्रसंगी हा धनादेश स्विकारताना कारखान्याचे अध्यक्ष अरूण तनपुरे हे भावनिक झाले. राहुरीतील सर्वच उस उत्पादन शेक-यांच्या वतीने त्यांनी सेठी परीवाराचे आभार मानले.

### प्रभाग १३ मधून स्वप्निल शिंदे यांच्या उमेदवारीस काँग्रेस पक्षांतर्फे हिरवा कंदील

**अहिल्यानगर :** आगामी अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून विविध पक्षांतर्फे तिकीट वाटपाच्या हालचालींना वेग आला आहे. काँग्रेस पक्षाच्या प्रभाग क्रमांक १३ मधून सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय जवळपास निश्चित झाला असून याबाबत आमदार हेमंत ओगले यांनी स्वतः हिरवा कंदील दाखविल्याचे समजते यावेळी आमदार हेमंत ओगले यांचा सत्कार करताना सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे समवेत युवक काँग्रेसचे अध्यक्ष मोसिनभाई शेख, नाझीम कुरेशी, आकाश कोरे, पियुष साठे, योगेश कसबे, रोहन लिंबू, तुषार देठे, विजय झेंडे आदी उपस्थित होते.


## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि.०३ नोव्हेंबर २०२५**

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१९० २८० ००० — २-९ — १३७ ३८० १००
जोड: ०८-२१-४३-९५-१७

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
१३० २४८ २२० — ४-५ — १४० १५९ ११३
जोड: ४७-९५-६२-०३-५८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१२४ ४६७ ७०० — ७-३ — १२० ६७० ५८०
जोड: ७०-१३-४२-६५-३९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |
| 23/06/2025 to 28/06/2025 | 159 53 247 | 125 81 236 | 279 81 137 | 248 48 800 | 256 31 344 | 349 64 590 |
| 30/06/2025 to 05/07/2025 | 145 06 349 | 470 14 699 | 334 02 660 | 470 15 780 | 369 89 126 | 223 75 267 |
| 07/07/2025 to 12/07/2025 | 189 81 380 | 233 88 224 | 378 88 189 | 699 41 335 | 248 48 125 | 458 77 467 |
| 14/07/2025 to 19/07/2025 | 789 44 248 | 116 85 140 | 138 28 189 | 359 72 138 | 689 36 268 | 678 13 346 |
| 21/07/2025 to 26/07/2025 | 790 68 350 | 678 10 299 | 389 05 456 | 377 71 669 | 378 82 345 | 150 61 678 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻


# एक आरोग्य : मानव, प्राणी व पर्यावरणाच्या सुसंवादातून शाश्वत आरोग्याचा समाजशास्त्रीय मार्ग

प्रत्येक वर्षी ०३ नोव्हेंबर हा दिवस 'एक आरोग्य दिन (One Health Day)' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस फक्त वैद्यकीय क्षेत्रापुरता मर्यादित नाही; तो सामाजिक, पर्यावरणीय आणि नैतिक जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित करतो. आधुनिक जगात मानवाचे आरोग्य स्वतंत्रपणे समजून घेणे शक्य नाही, कारण मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे जीवन परस्परांशी घट्ट गुंतलेले आहे. 'एक आरोग्य' ही संकल्पना याच परस्परसंबंधाचा विचार करून सांगते की पृथ्वीवरील सर्व सजीव आणि त्यांचा परिसर आरोग्याच्या मूळ गाभ्याशी निगडित आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर, 'एक आरोग्य' ही संकल्पना वैद्यकीय मर्यादेपलीकडे जाऊन सामाजिक रचना, संस्कृती, अर्थव्यवस्था, पर्यावरणीय नीती आणि मानवी वर्तन यांचा समग्र आरसा ठरते.

जागतिक आरोग्य संघटना (WHO), जागतिक प्राणी आरोग्य संघटना (WOH), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (FO) आणि संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) यांनी 'एक आरोग्य' संकल्पना विकसित केली आहे. यानुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे आरोग्य एकमेकांवर अवलंबून आहे. कोणत्याही घटकातील असमतोल संपूर्ण आरोग्यसाखळीला धोक्यात आणतो. उदाहरणार्थ, कोविड-१९ महामारी झूनोटिक रोगांचे ठळक उदाहरण आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, ६०% पेक्षा जास्त संसर्गजन्य




रोग प्राण्यांकडून मानवाकडे पसरणारे आहेत.

समाजशास्त्रीय दृष्टिकोन सांगतो की आरोग्य हे फक्त आजार नसण्याची स्थिती नसून शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलनाची अवस्था आहे. ही अवस्था समाजातील मूल्यव्यवस्था, आर्थिक परिस्थिती, शिक्षण, लिंगसमानता, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक आचारांवर अवलंबून असते. ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि पोषणाची कमतरता ही केवळ वैद्यकीय नव्हे, तर सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आहे. शहरी प्रदूषण, ध्वनीकल्लोळ आणि मानसिक ताणतणाव हे आधुनिक जीवनपद्धतीचे उपउत्पादन आहेत.

भारतीय परंपरेतही 'एक आरोग्य'सदृश विचार आढळतात. प्राचीन ग्रंथ मानव आणि निसर्गाच्या सुसंवादाला उच्च स्थान देतात. वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेत पृथ्वीवरील सर्व सजीव एकाच कुटुंबाचे घटक मानले आहेत.

पर्यावरणीय असंतुलन हा आरोग्याचा सर्वात मोठा सामाजिक धोका बनला आहे. वृक्षतोड, प्लास्टिक संस्कृती, रासायनिक शेती, प्रदूषण आणि औद्योगिक कचरा यांमुळे माती, पाणी आणि हवा दूषित झाली आहे. यामुळे श्वसनाचे विकार, त्वचारोग, कर्करोग, अन्नातील विषारी घटक तसेच मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक वाढले आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोन सांगतो की या परिस्थितीचा फटका सर्वाधिक दुर्बल वर्गांना बसतो.

'एक आरोग्य' मानसिक आरोग्यावरही भर देते. आधुनिक जीवनशैली, प्रदूषण, नोकरीतील अस्थिरता, सामाजिक एकाकीपण आणि नैसर्गिक संसाधनांपासून तुटलेले मानवी संबंध मानसिक असंतुलन निर्माण करतात. निसर्गाच्या सान्निध्यात राहिलेल्या समाजांमध्ये मानसिक आरोग्य अधिक संतुलित असते.

संयुक्त राष्ट्रांच्या २०३० टिकाऊ विकास उद्दिष्टांत आरोग्य आणि कल्याण, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता, हवामान कृती आणि जमिनीवरील जीवन या उद्दिष्टांचा 'एक आरोग्य'शी थेट संबंध आहे. शालेय शिक्षणापासून आरोग्यसेवा, कृषी आणि उद्योग क्षेत्रापर्यंत संकल्पनेचे सामाजिक आकलन झाल्यास 'आरोग्यपूर्ण समाज' निर्माण होऊ शकतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्य म्हणजे व्यक्तीच्या वैयक्तिक जबाबदारीपुरता मर्यादित नसून सामाजिक एकत्रिकता, सहजीवन, पर्यावरणीय जबाबदारी आणि न्याय या मूल्यांवर आधारित असते. आपले आहार, उपभोग संस्कृती, कचरा व्यवस्थापन, जलस्रोतांचे संरक्षण, जैवविविधतेचे जतन आणि प्राण्यांविषयी संवेदनशीलता या गोष्टी आरोग्यदृष्टीला आकार देतात.

शेवटी, 'एक आरोग्य दिन' आपल्याला स्मरण करून देतो की मानव निसर्गापासून वेगळा नाही. पृथ्वी, प्राणी, वनस्पती, हवा, पाणी आणि मानव हे सर्व एकाच जीवनसाखळीचे घटक आहेत. या साखळीतील कोणताही घटक दुर्लक्षित झाला तर संपूर्ण आरोग्यव्यवस्था असंतुलित होते. 'एक आरोग्य' म्हणजे आरोग्याचा सर्वसमावेशक, लोकशाही मार्ग, जिथे विज्ञान, समाज, निसर्ग आणि मानवता एकत्र येऊन शाश्वत जग निर्माण करतात.

०३ नोव्हेंबरचा 'एक आरोग्य दिन' साजरा करणे म्हणजे आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे. मानवाचे आरोग्य, प्राण्यांचे आरोग्य आणि पर्यावरणाचे आरोग्य हे तिन्ही एकत्र बांधलेले आहेत, या जाणिवेनेच खऱ्या अर्थाने 'एक आरोग्य' साकार होईल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

# सरकारी शाळा हीच खरी राष्ट्रनिर्मितीची पायाभूत संस्था : पोपटराव पवार

## ‘आडवाट’ लघुपटाचे प्रदर्शन व शिक्षक सन्मान सोहळा उत्साहात








प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : सरकारी शाळा या राष्ट्रनिर्मितीच्या मूलभूत संस्था आहेत. त्यातूनच अनेक यशस्वी नागरिक घडले आहेत. ग्रामीण भागातील प्रत्येक पालकाने आपल्या मुलांना सरकारी शाळेत शिकवून त्या टिकवण्याचा संकल्प करावा, म्हणजेच शिक्षणातील समानता आणि गुणवत्ता दोन्ही साधता येईल, असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी केले. ते ‘सरकारी शाळा वाचवा अभियान’ आणि ‘मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद’ यांच्या वतीने निर्मित ‘आडवाट’ या लघुपटाच्या प्रदर्शन व शिक्षक सन्मान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या लघुपटाचे प्रदर्शन शहरातील माऊली सभागृहात संपन्न झाले. शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘आडवाट’ या लघुपटाची निर्मिती ‘सरकारी शाळा वाचवा अभियानाचे’ मुख्य संयोजक सुदाम लगड यांनी केली असून, लेखन डॉ. बापू चंदनशिवे यांचे आहे. दिग्दर्शन श्याम शिंदे यांनी केले. या लघुपटाचे चित्रीकरण अकोले तालुक्यातील फोपसंडी, पळसुंदे तसेच नगर तालुक्यातील विविध ठिकाणी झाले आहे. शिक्षणाची आवड असलेल्या एका मुलीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शाळा बंद झाल्यानंतर निर्माण होणारी परिस्थिती आणि विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान याचे वास्तव दर्शन या लघुपटात घडविण्यात आले आहे.

कार्यक्रमात युनूस तांबटकर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, विपुल वाखुरे युवा उद्योजक, अशोक पठारे सामाजिक कार्यकर्ते, कृष्णा लोकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

लघुपटाच्या प्रदर्शनानंतर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या वेळी बोलताना डॉ. पवार म्हणाले,ग्रामीण भागातील शिक्षक हे केवळ शिक्षक नसून समाज परिवर्तनाचे वाहक आहेत. शाळा टिकवण्यासाठी गावातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेतला पाहिजे. सरकारी शाळा बंद होणे म्हणजे भविष्यकाळातील असमानतेची बीजे रोवणे होय.

तसेच त्यांनी तरुण शिक्षकांना उद्देशून सांगितले की, आपल्या कामात प्रामाणिकपणा आणि जनजागृतीचा ध्यास ठेवा. प्रत्येक गावात शाळा टिकली पाहिजे, तरच ‘आडवाट’सारख्या कथा कल्पनेतच राहतील.

प्रास्ताविक भाषणात सुदाम लगड यांनी सर्व मान्यवरांचा परिचय करून दिला . सरकारी शाळा ही गरीब विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण आहे. त्या टिकल्या पाहिजेत यासाठी हा लघुपट समाजासमोर आरसा ठरेल,व आज सरकारी शाळा बंद होत आहेत व शिक्षणा मध्ये खाजगी संस्थेचे वाढते प्रमाण हे भविष्यात गरिबांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे हे मोठे षडयंत्र आहे त्याविरुद्ध आम्ही सर्व उभे राहू व आपण सर्वांनी त्यासाठी योगदान देणे गरजेचे आहे असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि नगरकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत द्रविड यांनी केले.आभार प्रवीण सोनवणे यांनी मानले

## हवामान,मोबाईल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

# मानवी अस्तित्वावर संकट : भटकळ




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : हवामान बदल, मोबाईलचा अतिरिक्त वापर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा अनियंत्रित विस्तार हे मानवजातीसमोरचे सर्वात मोठे संकट आहे. या संकटांचा मुकाबला करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती, देश आणि शासनयंत्रणेने एकत्र येऊन ‘कृतिशील वज्रमूठ’ तयार करणे अत्यावश्यक आहे, असा ठाम इशारा प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक व ‘पाणी फाउंडेशन’चे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी दिला.

स्नेहालय संस्थेच्या मागील ३६ वर्षांच्या सामाजिक वाटचालीचा संशोधनात्मक मागोवा घेणाऱ्या ‘अप अगेन्स्ट डार्कनेस’ या इंग्रजी पुस्तकाच्या मराठी अनुवाद ‘फिटे अंधाराचे जाळे’ या पुस्तकाचे प्रकाशन अहिल्यानगरात मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी सौ. स्वाती भटकळ, ‘सत्यमेव जयते’ टीव्ही शोच्या सहदिग्दर्शक व संशोधन प्रमुख, तसेच सत्यजित भटकळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी पुस्तकाच्या लेखिका मेधा देशमुख भास्करन आणि अनुवादिका सुनंदा सदाशिव अमरापुरकर यांची प्रकट मुलाखत प्रा. डॉ. दया भोर यांनी घेतली.

हवामान बदलाचे दुष्टचक्र सुरू झाले आहे भटकळ

भटकळ म्हणाले, या वर्षी महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थकारणावर हवामान बदलाचा प्रचंड फटका बसला. दुष्काळी भागात पाऊस आणि पुराने हाहाकार माजवला. पावसाळा संपायचं नाव घेत नाही हे अपवाद नाही, तर पुढील काळातील ‘नवीन सामान्यता’ आहे. हे भाकीत नाही, हे वास्तव आहे.

मोबाईल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अतिरेकामुळे निर्माण होणाऱ्या विकृती मानवी संवाद, विश्वास आणि माणुसकी नष्ट करत असल्याचे ते म्हणाले. तरुणाई आणि सामाजिक संस्था यांनी या प्रश्नांवर गांभीर्याने संवाद साधून सामूहिक कृती केली पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले.

स्नेहालय संस्थेच्या सामाजिक योगदानाबद्दल बोलताना सत्यजित भटकळ म्हणाले, स्नेहालयने आपल्या नैतिक मूल्यांचा आणि समावेशकतेचा ध्यास जपला आहे. इतर संस्थांना अनुभव, तंत्र आणि साधनांची मदत देत स्नेहालयने सेवाकार्याची अध्यात्मिक मातृशक्ती म्हणून कार्य केले.

स्वाती भटकळ यांनी सांगितले की, स्नेहालय आमच्यासाठी गेल्या १६ वर्षांपासून माहेर आहे. ‘सत्यमेव जयते’ करताना आम्ही स्त्रीभ्रूणहत्येवरील संशोधनात ‘स्नेहांकुर’च्या कार्यातून समाजाला जागवले, जे देशासाठी दिशादर्शक ठरले.

लेखिका मेधा देशमुख भास्करन म्हणाल्या, एड्सग्रस्त, बहिष्कृत महिलांना आईबहिणीप्रमाणे सांभाळणारे डॉ. गिरीश आणि डॉ. प्राजक्ता कुलकर्णी यांचे कार्य करुणा आणि दयेच्या पलिकडे जाते. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे असामान्यत्व आणि देवत्वाची अनुभूती या कार्यातून मिळाली.

अनुवादिका सुनंदा अमरापुरकर म्हणाल्या, सदाशिव अमरापुरकर यांच्या माध्यमातून स्नेहालयशी नाते जुळले. संतवचनांतली मानवता स्नेहालयने कृतीत उतरवली. हे पुस्तक अनुवादताना मानवतेची दिव्य अनुभूती मिळाली.

‘फिटे अंधाराचे जाळे’ या पुस्तकाचे अभिवाचन रेडिओ नगर ९०.४ एफएम वर रीमा अमरापुरकर यांनी केले असून, लवकरच याचे ध्वनीपुस्तकही श्रोत्यांसाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती संपादक भूषण देशमुख यांनी दिली.

सकाळ प्रकाशनाचे व्यवस्थापक आशुतोष रामगीर यांनी सांगितले की, लेखिका आणि अनुवादिका दोघीही नगरच्या असल्याचा आम्हाला अभिमान आहे; माझेही बालपण इथेच गेले.

कार्यक्रमाचे स्वागत डॉ. महेश मुळे यांनी केले, सूत्रसंचालन सौ. स्वाती रानडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रीती भोंबे यांनी केले.

प्रेरणागीते संपदा चौधरी आणि साक्षी नरवडे यांनी सादर केली.

स्नेहालयच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड, मंगलताई अहिरे, संस्थेचे कार्यकर्ते, माजी विद्यार्थी आणि वंचित घटकातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लाड जळगाव येथील धनगर वस्तीजवळील ओढा गायब

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** शेवगाव तालुक्यातील लाड जळगाव येथील धनगर वस्ती जवळील ओढा की जो पुढे जाऊन लाड जळगाव येथील काशी नदीस मिळतो तो गायब झाला आहे.

या बाबत सविस्तर हकिगत अशी की लाड जळगाव येथे १९७२ च्या दुष्काळात धनगर वस्ती जवळील ओढ्यावर रोजगार हमी योजने अंतर्गत मजुरांना काम देण्यासाठी नाला बांडिंग चे काम करण्यात आले व त्यात ज्यांची जमीन गेली त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई भरपाई देण्यात आली या नाला बाडिग मुळे पाणी अडविले जाऊ लागले पण आसपास राहणाऱ्या शेतकरी यांना याचा त्रास होऊ लागल्याने त्याचे खालील दगडी पिचिंग हळु हळू काढण्यात आले जे जेणे करून नाल्यात पाणी साठवण कमी होईल व आसपासचे राहणारे यांना साठवलेल्या पाण्याचा त्रास होणार नाही व पुढे पुढे पर्जन्यमान कमी कमी होत गेले व ग्रहण केलेली जमीन पण शेतकरी यांनी ताब्यात घेतली तसेच त्या खालील ओढा यास पण पाणी वाहत नसल्याने तो ओढा ही आजू बाजूच्या शेतकऱ्यांनी भुई सपाट करून त्यात पीक पेरणी सुरू केली

या वर्षी जास्त पाऊस झाला व पाणी वाहून जाणार ओढा नसल्याने पूर्वी ओढ्याने वाहून जाणारे पाणी माझ्या शेतात घुसून माझे फार मोठे नुकसान झाले आहे माझ्या पूर्ण शेतीत पाणी घुसले आहे तरी याची पाहणी करून ओढा जो होता त्यावरील अतिक्रमण दूर करावे अशी लेखी मेल द्वारे मागणी लाड जळगाव येथील शेतकरी प्रमोदकुमार ताराचंद छाजेड यांनी कामगार तलाठी लाड जळगाव,तहसीलदार शेवगाव,जिल्हाधिकारी अहिल्या नगर यांना केली आहे

गेल्या वर्षी याच नाला बॅन्डिंग मधील गाळ काढण्याचे काम देखील व्यवस्थित झालेले नाही कारण गाळ न काढता बिल निघाले आहे अशीही तक्रार त्यांनी लघु पाटबंधारे उपविभाग नेवासा,गट विकास अधिकारी शेवगाव,मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्या नगर यांना केली होती ते अपूर्ण कामही करून मिळावे अशी प्रमोदकुमार छाजेड यांची मागणी आहे

# सिस्पे आर्थिक घोटाळ्यातील आरोपींचा जामीन फेटाळला!

**लिंपणगाव /श्रीगोंदा** : बहुचर्चित Sispay Infinity Beacon या कंपनीच्या प्रचंड आर्थिक घोटाळा प्रकरणात अटक झालेल्या आरोपी विक्रम बबन गाडीलकर आणि कैलास सुदाम वाळुंज यांच्या जामीन अर्जावर आज अहमदनगर जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान सर्व युक्तिवाद आणि पुरावे पाहता न्यायालयाने दोन्ही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळून दिले.

श्रीगोंदा पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६(२), ३१६(५), ३१८(२), ३१८(४), ३(५) तसेच महाराष्ट्र ठेवीदार (वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण) अधिनियम १९९९ चे कलम ३ अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल आहे.

तपासादरम्यान आरोपी विक्रम गाडीलकर याच्याकडे तब्बल छ९ कोटी १७ लाख ३९ हजार ८१२ रुपयांची रक्कम असल्याचे उघड झाले आहे. तसेच त्याचा भाऊ विनोद बबन गाडीलकर हा सुपे परिसरातील डळीरूिखपषळपळीं कंपनीचा प्रमुख एजंट असल्याचे समोर आले आहे. गुन्ह्यातील जबाबदारीपासून वाचण्यासाठी गाडीलकर कुटुंबीय आणि काही एजंटांनी खाजगी फिर्याद दाखल करून कंपनी संचालकांविरुद्ध एफआयआरचे आदेश मिळवले; मात्र तपासात ते स्वतःच आरोपी ठरले.

या प्रकरणातील फिर्यादी/साक्षीदार सुशील भानुदास घोडके यांच्या वतीने ड. शुभम रमेशराव साके आणि ड. प्रेरणा आप्पासाहेब धेंडे यांनी जोरदार युक्तिवाद केला. त्यांनी न्यायालयासमोर गुंतवणूकदारांची फसवणूक, आर्थिक शोषण आणि परदेशात हवाला मार्गे पैसा पाठवल्याची शक्यता मांडली. तसेच या प्रकरणाचा तपास उच्चस्तरीय यंत्रणेकडे देण्याची मागणीही केली.

सर्व बाबींचा विचार करून न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा गंभीर आर्थिक गुन्ह्यांमध्ये आरोपींना कायद्याच्या पळवाटीतून सुटका मिळू शकत नाही. या निर्णयामुळे फसवणूक झालेल्या शेकडो गुंतवणूकदारांना दिलासा मिळाला असून, ड. साके आणि ड. धेंडे यांच्या ठाम, निःस्वार्थ प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या युक्तिवादामुळे गुंतवणूकदारांना न्याय मिळण्याची एक नवी आशा निर्माण झाली आहे.

# जोहरपूरभातकुडगाव रोडची दयनीय अवस्था; काम सुरू न झाल्यास उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : जोहरपूर ते भातकुडगाव हा महत्त्वाचा मार्ग गेल्या काही महिन्यांपासून अक्षरशः खड्ड्यांनी व्यापला आहे. या रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे .गावातील नागरिक, शाळकरी मुले, तसेच डिलिव्हरी पेशंटना रुग्णालयात नेणेही अत्यंत कठीण झाले आहे.

या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पालकमंत्री यांच्या विशेष सहकार्याने २०२५ मध्ये निधी मंजूर झाला होता, तसेच कॉन्ट्रॅक्टरने काही काळ कामही सुरू केले होते. मात्र, काही राजकीय कारणांमुळे हे काम अर्धवटच बंद पडले. खोदकाम झालेला रस्ता तसाच खुला पडून असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर माजी सरपंच अशोकराव देवडे, बाबासाहेब जाधव, अशोकराव पंडित, अजिनाथ उगलमुगले सर आदी मान्यवरांनी संताप व्यक्त केला असून, काम का थांबले याचे उत्तर आणि जबाबदारी पालकमंत्री आणि संबंधित विभागाकडेच आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. माजी सरपंच अशोक देवडे यांनी सांगितले की, शाळकरी मुली शाळेत जाऊ शकत नाहीत, गर्भवती महिलांना रुग्णालयात नेणे अशक्य झाले आहे. आमदारांनी स्वतः लक्ष घालून रस्त्याचे काम एका महिन्याच्या आत पुन्हा सुरू करावे, अशी मागणी आमदार मोनिका राजळे यांच्याकडे करण्यात आली आहे. दरम्यान, डिसेंबर अखेरपर्यंत काम सुरू झाले नाही, तर १०० महिलांसह शेवगाव येथील सार्वजनिक बाधकाम विभाग कार्यालयासमोर ‘अमरण उपोषण’ करण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## शिवपानंद शेत रस्ता चळवळीचा इशारा

# ‘रस्ता नाही तर मत नाही!’

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या शेतात जाण्यासाठी आजही रस्ता नाही, ही धक्कादायक वस्तुस्थिती समोर आली आहे. शासनाच्या मालकीचे असूनही अनेक शेतरस्ते, शिवरस्ते आणि पाणंद रस्ते अतिक्रमण, अडथळे आणि न्यायालयीन वादांमध्ये अडकलेले असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेत रस्ता चळवळ या संघटनेने तीव्र नाराजी व्यक्त केली असून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महसूल तसेच कृषी मंत्र्यांना निवेदन देऊन तातडीने ठोस कारवाईची मागणी केली आहे.

**चळवळीच्या प्रमुख मागण्या** : सर्व न्यायालयीन शेतरस्ता प्रकरणे शासनाकडे वर्ग करावीत, जेणेकरून वर्षानुवर्षे चालणाऱ्या लढ्यांना शेवट होईल. तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना अधिकारवृद्धी देऊन अतिक्रमणविरोधी आदेश तत्काळ लागू करण्याची व्यवस्था करावी. महसूल विभागाला प्रमुख जबाबदारी देऊन सर्व शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करावेत. सुधारित शासन निर्णय शेतरस्ते व गाव नकाशे संरक्षण २०२५ नावाने जारी करावा. पोलीस संरक्षणासाठी शेतकऱ्यांकडून शुल्क घेण्याची प्रथा बंद करावी व घेतलेली रक्कम परत करावी. शेतकऱ्यांनी आपसात समन्वयाने रस्ते खुले केल्यास त्यांच्या शासनस्तरावर गौरवाचा सन्मान करावा. शिवपानंद शेत रस्ता विकास मंत्रालय स्थापन करून स्वतंत्र प्रशासन प्रणाली उभारावी.

शासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी शासनाच्या निष्क्रियतेविरुद्ध रस्त्यावर उतरेल. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांवर ‘रस्ता नाही तर मत नाही!’ या घोषणेअंतर्गत बहिष्काराचा विचार केला जाईल, असा इशारा चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी दिला.

राज्यातील हजारो शेतकरी आजही नकाशावरील गोंधळ, अतिक्रमण आणि न्यायालयीन स्थगितीमुळे स्वतःच्या शेतात पोहोचू शकत नाहीत. महसूल, ग्रामपंचायत आणि पोलिस विभागांमधील समन्वयाचा अभावही या समस्येला अधिक गुंतागुंतीचा बनवत आहे. शासन निर्णय असूनही अंमलबजावणीचा अभाव शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण करतो आहे.

शेतकऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर जाण्याचा हक्क मिळावा ही मागणी मूलभूत आहे. रस्ता नसणे म्हणजे जगण्याचा मार्गच बंद होणे त्यामुळे शासनाने ही समस्या केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्षात उतरणे आवश्यक आहे.

# समाजरत्न सन्मानाने उजळला शहरटाकळीचा गौरव!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**शहरटाकळी** : शहरटाकळी पंचक्रोशीत अल्पावधीतच नावारूपास आलेल्या आणि बारा कुटुंबांची आर्थिक व सामाजिक कामधेनू ठरलेल्या सन्मित्र स्वयं सहाय्यता पुरुष बचत गटाची वार्षिक आढावा सभा नुकतीच आनंद साधकाश्रम, भावी (निमगाव) येथे उत्साहात पार पडली.

सदरील सभेच्या प्रारंभी सन २०२४-२५ या वर्षाचा आर्थिक अहवाल गटाचे अध्यक्ष श्री. राहुल मिसाळ यांनी सादर केला. गटाचे सचिव किशोर कोल्हे यांनी अहवालावर चर्चा करून सर्व सदस्यांकडून त्यास अनुमोदन मिळवले. आर्थिक साक्षरता, बचत-विनियोग आणि लेखापरीक्षण या विषयांवर सहकारी संस्था लेखापरीक्षक . देविदास दगडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून देविदास दगडे, शेषराव आपशेटे, यांच्यासह गटाचे सदस्य श दादा खराडे, अमोल कनके, अभय कोल्हे, देवीदास शेळके, सोण्याबापू मिसाळ, शिवकुमार पिंपळे, अनिकेत आपशेटे, अमोल खंडागळे, काका कोल्हे व सुर्यकांत खंडागळे उपस्थित होते.

# ढवळगावमध्ये बिबट्याचा वावर ग्रामस्थांची पिंजरा लावण्याची मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील ढवळगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर सुरू असून ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी शेतशिवारातून बिबट्याचे आवाज, पावलांचे ठसे आणि जनावरांवर झालेल्या हल्ल्यांच्या घटनांमुळे गावकरी भयभीत झाले आहेत.

ग्रामस्थांच्या मते, गेल्या आठवड्यापासून बिबट्याने गावाच्या शिवारात वारंवार दर्शन दिले आहे. काही ठिकाणी शेळ्या, कुत्री अशा जनावरांवर हल्ला झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. व दिवसाही शेळ्या खाल्ल्याचा प्रकार याठिकाणी घडला आहे. यामुळे शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जाण्यास भीती वाटू लागली आहे. अनेकांनी रात्रीच्या वेळेस पिकांची देखभाल बंद केली आहे.

गावातील शालेय विद्यार्थी, महिला आणि वृद्ध नागरिक यांना घराबाहेर जाण्याची भीती वाटत आहे. मुलांना शाळेत नेणे-आणणे यामध्ये पालकांना सतत चिंता वाटते आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, रोज रात्री बिबट्याचे डरकाळी ऐकू येते, पावलांचे ठसे रस्त्याच्या कडेने दिसतात. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात भीतीचे सावट आहे. सरपंच उपसरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य तसेच स्थानिक समाजसेवकांनी या संदर्भात वनविभागाला वारनवार लेखी पत्र दिले असून ढवळगाव परिसरात पिंजरा लावण्याची मागणी केली आहे. वनविभागाकडून प्राथमिक पाहणी करून बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेतला जात असल्याचे समजते. मात्र, अद्याप प्रत्यक्ष पिंजरा लावण्यात आलेला नाही. त्यामुळे नागरिकांनी वनविभागाने त्वरीत कारवाई करून बिबट्याला पकडावे, अशी जोरदार मागणी केली आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाला आवाहन केले आहे की, बिबट्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवितहानी होऊ नये म्हणून सुरक्षेची काटेकोर व्यवस्था करावी. ढवळगाव ग्रामस्थ आता वनविभागाच्या कारवाईकडे लक्ष ठेवून आहेत.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री
सोमवार, दि.३ नोव्हेंबर २०२५ | अहिल्यानगर | पान नं. ६

# १५ लाख कोटी रुपयांचा निधी पडून.!

## माजीमंत्री बाळासाहेब थोरातांकडून गडकरींची स्तुती अन् सरकारवर टीका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी १५ लाख कोटीचा निधी पडून असल्याबद्दल व्यक्त केलेल्या खदखदीवरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केंद्र आणि राज्य सरकारला धारेवर धरलं आहे. नितीन गडकरी 'कामाचा माणूस' आहे, त्यामुळे त्यांच्या बोलण्याकडे गांभीर्यानं पाहण्याची गरज असल्याचं सांगत, थोरात यांनी एकप्रकारे सरकारच्या आर्थिक नियोजनावरच थेट हल्लाबोल केलाय. 'ते जर असं म्हणत असतील की १५ लाख कोटी पडून आहेत, तर त्याचा काळजीपूर्वक विचार आपण करायला हवा. गडकरी कामाचा माणूस आहे, हे माझं मत आहे', अशा शब्दात बाळासाहेब थोरात यांनी नितीन गडकरींचं कौतुक केलं असून केंद्र आणि राज्य शासनावर निशाणा साधला.



बाभळेश्वर येथे आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. राहुल गांधींनी जे पुरावे दिले त्यावर निवडणूक आयोगाने थातूर मातूर उत्तर दिलं. भाजप उत्तरे देतंय, कोणीतरी बाहेरचा आहे कोणी तरी आयोगाला चालवतंय असं वाटतंय. आदित्य ठाकरे किंवा राहुल गांधीच्या प्रश्नांची उत्तरे आयोगाने द्यावी, खिजवून बोलणे मुख्यमंत्र्यांना शोभत नाही. कालचं निमत्रंण सर्व पक्षांना दिल होतं, मात्र ते आले नाहीत.

काँग्रेसमधून सुरू असलेल्या आऊटगोईंगवर (पक्षांतर) थोरात यांनी शांतपणे, पण सूचक प्रतिक्रिया दिली. 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर होत आहे. पण, आमच्या दृष्टीने ही नवं निर्मितीची संधी आहे. अशावेळीच नवं नेतृत्व तयार होत असतं,' असं ते म्हणाले.

आमदार सत्यजित तांबे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याबद्दल विचारले असता, थोरातांनी थेट बोलणे टाळले. 'ते आता स्वतंत्र आहे आणि सज्ञान आहे. त्यांना सगळ्या पक्षातील नेत्यांनी मतदान केलं आहे. त्यांचा निर्णय ते घेऊ शकतात,' असं सांगत त्यांनी या विषयावर पडदा टाकला.

सुजय विखेंनी संगमनेर मतदार संघात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनुषंगाने तयारी सुरू केली यावर विचारले असता थोरात म्हणाले, 'त्यांना तो अधिकार, देशात कोणी कोठेही जावू शकतात. संगमनेरला जाण्याचं आश्चर्य वाटण्याचं काही कारण नाही. मीही कुठेही जावू शकतो. तुम्ही माईक ठेवून कोणाच्या प्रचाराला लागले तर कोणी हरकत घेऊ शकत नाही,' अशा शब्दात थोरातांनी पत्रकारांना उत्तर दिलं.

### राज्यात निष्काळजी कारभार

थोरात यांनी केवळ राजकीय टीका न करता, सरकारच्या निष्काळजी कारभारावरही बोट ठेवलं. कंत्राटदारांचे १ लाख ४० हजार कोटींचे बिल थकले असताना, निराधार आणि वयोवृद्ध लाभार्थ्यांना शासकीय योजनांचे पैसे वर्षभर मिळाले नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. 'वर्ष झालं तरी निराधार, वयोवृद्ध लाभार्थ्यांना शासकीय योजनेचे पैसे मिळत नाहीत. अशी परिस्थिती असेल, तर ते राज्य कुचकामी समजावं. जे निराधाराची काळजी घेऊ शकत नाही, त्यापेक्षा वाईट काहीच असू शकत नाही,' अशा कठोर शब्दांत त्यांनी राज्यकारभारावर ताशेरे ओढले.

### अजित पवारांना शेतकरी माफ करणार नाही

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी फुकट किती द्यायचं? असं वक्तव्य शेतकऱ्यांच्या संदर्भात केलं होतं. यावरून थोरात यांनी पवारांना चांगलंच सुनावलं. 'अर्थमंत्र्यांकडून असं वक्तव्य येणं शोभणारं नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहणं हे त्यांचं कर्तव्य आहे. तुम्ही जनतेनं मतं दिली म्हणून सत्तेत आहात. फुकट किती द्यायचं म्हणता? शेतकरी त्यांना माफ करणार नाही,' असा सणसणीत इशारा थोरात यांनी दिला.

---

## मुलाला ठार मारण्याची धमकी देऊन अत्याचार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील पूर्व भागात एक संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पतीच्या निधनानंतर मानसिक आघातात असलेल्या ३० वर्षीय महिलेला तिच्या मुलाला ठार मारण्याची धमकी देत जबरदस्तीने अत्याचार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी राजेंद्र बबन शेळके (रा. लाख, ता. राहुरी) याच्याविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तात्काळ कारवाई करून आरोपीला अटक केली आहे.

सदर महिलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, तिच्या पतीचे चालू वर्षी निधन झाले आहे . राजेंद्र बबन शेळके व त्याचा मुलगा अक्षय शेळके यांनी फसवणूक करून खोटे मृत्युपत्र तयार केले आणि तिच्या पतीच्या नावावरील जमीन कागदोपत्री फेरफार करून अक्षय राजेंद्र शेळके यांच्या नावावर केली.या प्रकाराबाबत महिलेनं वारंवार विचारणा केल्याने २० जुलै २०२५ रोजी रात्री अकराच्या सुमारास राजेंद्र शेळके तिच्या घरी गेला. त्यावेळी ती व तिचा मुलगा झोपलेले असताना आरोपीने मुलाला ठार मारण्याची धमकी देत बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. त्यावर महिलेनं 'माझी जमीन परत दे' असे सांगितल्यावर आरोपीने जातिवाचक शब्द वापरत, आम्ही तुमच्या जमिनी घेणार, तुम्ही माझं काय करणार? अशी अवमानकारक भाषा केली.यानंतरही आरोपीचे त्रास देणे सुरूच राहिले. दोन महिन्यांपूर्वी त्याने 'जमीन तुझ्या मुलाच्या नावावर करतो' असे सांगून तिला चारचाकी वाहनात बसवले व गावाबाहेर नेऊन पुन्हा तिच्यावर अत्याचार केला. त्यावेळीही मुलाला ठार मारण्याची धमकी देत तिला गप्प राहण्यास भाग पाडले.२० जुलै ते १ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आरोपीने वेळोवेळी महिलेला धमक्या देऊन व जातीवाचक अपमान करून तिच्यावर अत्याचार केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या प्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक राजू जाधव, हवालदार प्रदीप ढाकणे, नाईक गणेश लिपणे, नदीम शेख, अंकुश भोसले यांच्या पथकाने आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले आहे. पुढील तपास श्रीरामपूर उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर करत आहेत.

---

## महाराष्ट्र कोणाच्या बापाची जहागिरी नाही

### ओबीसी आरक्षणावर लक्ष्मण हाके यांचा फडणवीस–विखेंवर घणाघात!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर /शेवगाव :** गावातल्या पंचायती, राजकारणातल्या सर्व जागा मनोज जरांगेला देऊन टाका, पण जे-जे आमदार खासदार झाले त्यांच्या आमदारकी-खासदारकीचा मार्ग मात्र आपल्या वाड्या-वस्त्यांवरून जातो, हे विसरू नका! महाराष्ट्र हा १८ पगड जातींचा, दिनदलित, कष्टकरी, भटक्या-विमुक्त आणि अल्पसंख्यांकांचा आहे. तो कोणाच्या बापाची जहागिरी नाही, अशा शब्दांत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर तीव्र टीका केली.



शनिवार, दि. १ नोव्हेंबर रोजी बोधगाव (ता. शेवगाव) येथील मारुती मंदिर लगत आयोजित ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी आयोजित महाएल्गार मेळावा येथे ते बोलत होते.

हाके म्हणाले की, मुख्यमंत्री महोदय दहा टक्के लोकांच्या मताला घाबरून दोन सप्टेंबरचा जीआर काढतात आणि आमच्या ओबीसींचं आरक्षण बुडवतायत. १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाला, १९५० मध्ये राज्यघटना अमलात आली, आणि १९९४ मध्ये मंडल आयोग लागू झाल्यानंतर ओबीसी समाजाला थोडं प्रतिनिधित्व मिळालं. पण याचं दुःख काहींना सहन होत नाही, म्हणून आरक्षण संपवण्याचे डाव सुरू आहेत.

विश्वास पाटील यांच्या विधानावर हाके म्हणाले, जर ओबीसी सर्टिफिकेट असतं तर उच्च पदावर असतो, पण आता लायकी नसलेल्या माणसाच्या हाताखाली काम करावं लागतं – असं विधान करणं हे संविधान, सर्वोच्च न्यायालय आणि मागासवर्ग आयोगाचा अपमान आहे.

#### विखे पाटील आणि फडणवीस यांच्यावर थेट निशाणा

हाके म्हणाले, फडणवीस साहेब म्हणतात – ओबीसी तुमचा डीएनए आहे. मग त्याच वेळी आरक्षणाचा काडीमात्र संबंध नसलेल्या राधाकृष्ण विखे पाटलांना मराठा आरक्षण उपसमितीचं अध्यक्षस्थान देता? कारखानदारी, वायनरी चालवणारे, पाणी प्रश्न, उसदर वाढ, सामाजिक न्याय या विषयांवर न बोलणारे लोक सामाजिक न्यायाचे ठेकेदार झालेत. हे महाराष्ट्राचं दुर्दैव आहे.दारूचा कारखाना काढला म्हणजे आरक्षणाचं धोरण कळलं का? शिक्षण संस्था, उद्योग, कारखाने, तहसीलदार, कलेक्टर, आमदार, खासदार एवढं सगळं असून मराठा मागास झाला म्हणता, मग पुढे गेला कोण? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या मेळाव्यात ड. मंगेश ससाणे, बाळासाहेब सानप, अरुण जाधव, बाळासाहेब खटकळ, रामजी आंधारे, संगिताताई ढवळे, राजेंद्र दौंड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हाके यांनी अखेर सांगितले, महाराष्ट्र सामाजिक न्याय घेणाऱ्यांच्या हातात नाही, तर घराणेशाही, दारू आणि कारखानदारी चालवणाऱ्यांच्या हातात गेला आहे. पण आता ओबीसी समाज जागा झाला आहे – न्याय हक्कासाठीचा हा एल्गार थांबणार नाही.

---

## दुग्ध, सहकार व समाजकारणातील योगदानाचा गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** दुग्धचळवळीचे प्रणेते, सहकार क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्व आणि समाजकारणातील प्रेरणादायी नेता माननीय दुग्धयोगी श्री रावसाहेब पाटील म्हस्के यांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्याचा भव्य कार्यक्रम रविवार, दि. २ नोव्हेंबर २०२५ रोजी अतिशय उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. नाथाजी पाटील म्हस्के शैक्षणिक संस्थेच्या विद्या विकास पब्लिक स्कूलच्या प्रांगणात आयोजित या सोहळ्याला जिल्ह्यातील तसेच राज्यातील अनेक मान्यवर, सहकारी नेते, शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, दूध उत्पादक, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या भव्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महसूल मंत्री आमदार बाळासाहेब थोरात होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मा. आ. दादाभाऊ कळमकर, खासदार निलेश लंके, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा मीनाताई जगधने, बिपीन कोल्हे, माजी आमदार बी. के. मुरकुटे, खा. भास्कर भगरे, डॉ. सुधीर तांबे, संदीप वर्पे, सचिनराव गुजर, दीपक साळुंखे, बाळासाहेब गायकवाड, वंदनाताई मुरकुटे, महेंद्र शेळके, करण ससाने, राजेंद्र फाळके, अरुण पाटील कडु, शालिनीताई विखे आदी मान्यवरांचा सहभाग होता.

या प्रसंगी नाथाजी पाटील म्हस्के यांच्या पुतळ्याचे अनावरण मा. बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते आणि मा. दादाभाऊ कळमकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रावसाहेब म्हस्के यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवासाचा आढावा घेण्यात आला. बाभळेश्वर दूध संघाची स्थापना, दुग्धउद्योगातील योगदान, सहकारातून ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी केलेले प्रयत्न, रयत शिक्षण संस्थेमार्फत शिक्षणाचा प्रसार, तसेच क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांचा सहभाग – या सर्व कार्याचा गौरव करण्यात आला.

---

## चांदेकसारेत शेतातील शेडच चोरीला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव :** कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे येथे अजब घटना घडली असून मागील महिन्यात सततचा पाऊस असल्याने धनंजय चव्हाण हे शेतकरी आठ ते दहा दिवस शेतात गेले नाही. याचाच फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या शेतातील बांधलेली कांदा चाळ व मजुरांसाठी बांधलेल्या शेडचे पत्रे चोरट्यांनी चोरून नेले. चोरटे एवढ्यावर थांबले नाही तर शेतात असलेला स्पिंकलर सट देखील या चोरट्याने चोरला.

पाऊस उघडल्यानंतर धनंजय चव्हाण शेतात गेले असता त्यांच्या घडलेल्या प्रकार लक्षात आला.भुरट्या चोऱ्या शेतातील विद्युत मोटारी यांच्या चोऱ्या हे सर्रास चालू आहे. मात्र थेट चोरट्याने आता तर शेतात बांधलेल्या घरावरच डल्ला मारला. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.समृद्धी महामार्ग लगत असलेल्या गीताबाई धनंजय चव्हाण यांनी आपल्या सर्वे नंबर १६९/५ मध्ये शेतातील वस्तू साठवण्यासाठी पत्र्याचे शेड बांधले होते. जवळपास दोन अडीच लाख रुपये त्यांनी यासाठी खर्च केला होता. मात्र पाऊस सुरू असल्याने दहा ते पंधरा दिवस शेतात चक्कर मारण्यासाठी त्यांचे कुटुंब गेले नसल्याचा फायदा खऱ्या अर्थाने चोरट्यांने घेतला.१८ पत्रे टॉमीच्या साह्याने त्यांनी खोलुन घेतले. शेतात असलेले स्पिंकलरचा सट ११ गन व २५ पाईप चोरले गेले.

सदर घटना धनंजय चव्हाण यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनची संपर्क साधला. घटनेचा तपास लावण्यासाठी त्यांनी पोलीस स्टेशनला विनंती केली. मात्र या अजब घटनेचा तपास लावण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

---

## अपहरण करुन अत्याचार; वडिलांसह मित्राला अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील अपहरण झालेल्या सोळा वर्षीय मुलीचे अपहरण करणाऱ्या अल्पवीन युवकाला मदत करणाऱ्या वडिलासह मित्राला शिक्रापूर पोलिसांनी अटक केली.

घटनेची हकीकत अशी, एका अल्पवयीन सोळा वर्षीय युवतीचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याबाबतचा गुन्हा शिक्रापूर पोलिसांत दाखल असताना सदर युवतीचे एका अल्पवयीन युवकाने अपहरण करुन हैद्राबाद मध्ये नेल्याची माहिती पोलिसांना मिळाली त्यांनतर पोलीस हवालदार विश्वांबर वाघमारे व राकेश मळेकर यांनी थेट हैद्राबाद गाठले मात्र दोघे अल्पवयीन येथून ओडीसा आणि नंतर मनमाड मार्गे जालन्यात फरार झाले होते, मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने त्यांना शोधून जालना येथून ताब्यात घेतले, दरम्यान दोघांकडे चौकशी केली असता त्यांना अल्पवयीन युवकाचे वडील सर्जे राव भारसाखळे व मित्र राहुल कांबळे या दोघांनी मदत केल्याचे समोर आले. दरम्यान पोलिसांनी अल्पवयीन युवतीचा जबाब नोंदवला असता तिचे अपहरण करणाऱ्या अल्पवयीन युवकाने तिच्यावर अत्याचार केल्याचे समोर आल्याने पोलिसांनी सदर अल्पवयीन युवकासह त्यांना मदत करणाऱ्या युवकाचे वडील व मुलगा यांच्यावर बाललैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हे दाखल करत पोलिसांनी सर्जेराव आण्णासाहेब भारसाखळे (वय ४० वर्षे सध्या रा. स्वप्नगरी कॉलनी पाबळ रोड शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) व राहुल मोहन कांबळे (वय २१ वर्षे सध्या रा. गणेशवस्ती विठ्ठलवाडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. मुगगाव ता. पाटोदा जि. बीड) या दोघांना अटक करत त्यांना न्यायालयात हजर केले असताना न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली असून पुढील तपास पोलीस हवालदार विश्वांबर वाघमारे हे करत आहे.

---

## अंत्यविधीसाठी निघालेल्या पती-पत्नीवर काळाचा घाला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर गंगापूर हायवेवर आज सकाळी झालेल्या भीषण अपघातात गंगापूर येथील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार लक्ष्मी नगर भेंडाळा रोड गंगापूर येथील रहिवासी अलीमोद्दिन करिमोद्दीन सय्यद वय ६२ वर्ष व हनिफाबी अलीमोद्दिन सय्यद वय ५९ वर्ष हे पती पत्नी आपल्या नातेवाईकाच्या अंत्यविधीसाठी वैजापूर तालुक्यातील म्हस्की येथे मोटर सायकलने जात होते त्यावेळी चोर वाघलगाव जवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. अपघात झाल्यानंतर त्यांना तात्काळ विरगाव पोलीस व ग्रामस्थांच्या मदतीने वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले तेथे डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या दुर्दैवी घटनेमुळे गंगापूर शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मृतांच्या पश्चात १ मुलगा व २ मुली असा परिवार आहे. विरगाव पोलीस अधिक तपास करीत असून अज्ञात वाहनाचा शोध सुरू आहे.

---

### जि.प., पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीसाठी

## विखे–थोरात यांची जोरदार मोर्चे बांधणी

**रवि बालोटे | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** अहमदनगर जिल्ह्यातील आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकांचे रणशिंग फुंकले गेले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात या दोन्ही दिग्गजांनी आपापल्या परीने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. या निवडणुकांमध्ये विखे आणि थोरात यांच्यात प्रतिष्ठेची लढत होणार यात तिळमात्र शंका नाही, त्यामुळे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात सध्या मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.





पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नुकतेच जोर्वे आणि आश्वी गटातून कार्यकर्ता मेळावे घेतले. या मेळाव्यांमध्ये त्यांनी कार्यकर्त्यांना येणाऱ्या निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. विधानसभेप्रमाणे या निवडणुकीतही शतप्रतिशत विजय आपलाच आहे, असे सूचक वक्तव्य करत त्यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. विखे गटाकडून विजयासाठी कंबर कसण्यात आली असून, नियोजनबद्ध पद्धतीने तयारी सुरू असल्याचे चित्र आहे.

दुसरीकडे, बाळासाहेब थोरात यांनी सहकारी संस्थांच्या माध्यमातून गावागावांत कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्यास सुरुवात केली आहे. या बैठकांमध्ये ते संभाव्य उमेदवारांची चाचपणी करत असून, निवडणुकीची रणनीती आखत आहेत. थोरात गटही या निवडणुकांना गांभीर्याने घेत असून, विजयासाठी कोणतीही कसर सोडणार नाही, असे दिसत आहे.या दोन्ही गटांकडून जाती-समीकरणांनुसार उमेदवारांना संधी दिली जाणार आहे. तरुण आणि नवीन चेहऱ्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक अनपेक्षित चेहऱ्यांना अचानकपणे उमेदवारी मिळू शकते, अशी चर्चा राजकीय गोटात सुरू आहे.आश्वी गटात यंदा महिलांचे राज्य दिसणार आहे. या गटातील दोन गणांसह गटावरही महिलाच नेतृत्व करताना दिसतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. याउलट, जोर्वे गटात मात्र पुरुषांची मक्तेदारी कायम राहणार असल्याचे चित्र आहे.

दोन्ही गटांकडून ही निवडणूक प्रतिष्ठेची बनल्यामुळे उमेदवारी देताना मोठी गुंतागुंत निर्माण होणार आहे. अनेक इच्छुकांमुळे उमेदवारी निश्चित करणे दोन्ही नेत्यांसाठी आव्हान ठरणार आहे. या परिस्थितीत नाराज झालेले अनेक जण अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे, ज्यामुळे निवडणुकीची रंगत आणखी वाढेल. या निवडणुकीसाठी भाजप आणि काँग्रेससह राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पक्षाकडूनही उमेदवारीची मागणी होत आहे. त्यामुळे ही निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता असून, प्रत्येक जागेवर अडेच लढत पाहायला मिळेल.एकंदरीत, अहमदनगर जिल्ह्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अत्यंत चुरशीच्या होणार असून, विखे आणि थोरात यांच्यातील ही राजकीय लढत पाहण्यासाठी जिल्ह्याची जनता उत्सुक आहे.